रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८८ । अंक २१ । पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

विकणे आहे
महिंद्रा जिटो २०१८ मॉडेल
उत्तम स्थिती पासिंग २०२६ पर्यंत विकणे आहे.
पत्ता : साई-इन हॉटेल चोंढी, अलिबाग.
मो.नं. ९८८१५७५८१३


# कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. २७ जून २०२४

किंमत ४ ₹


## 'आता ताकतीनं उठाव करणार'

**जालना :** सरकारकडून मराठ्यांवर १०० टक्के अन्याय होणार आहे, हे आम्हाला दिसत आहे. त्यामुळं आता आम्ही ताकतीने उठाव करणार असल्याचे वक्तव्य मनोज जरांगे पाटील यांनी केलं. मंत्री शंभूराज देसाई यांच्या शब्दाखातर १३ जुलैपर्यंत आम्ही वाट पाहणार आहोत असे मनोज जरांगे म्हणाले. १३ जुलैपर्यंत मराठा आरक्षणाच्या संदर्भातील प्रश्न निकाली काढण्यासाठी सरकारला वेळ देण्यात आला आहे. त्यामुळं १३ जुलैपर्यंत सरकार काय निर्णय घेणार हे पाहावं लागेल. मराठा आणि कुणबी एकच आहेत. त्यामुळं सगळ्या मराठ्यांना प्रमाणपत्र देणं गरजेचं असल्याचे जरांगे म्हणाले.

# वर्षा सहलींवर प्रशासनाची करडी नजर

### दुर्घटना टाळण्यासाठी गाव पातळीवर नियोजन
### जिल्हा आपत्ती व्यवस्थापन आढावा बैठक संपन्न



**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

जिल्ह्यात पावसाला बऱ्यापैकी सुरुवात झाली आहे. निसर्गप्रेमींसह पर्यटकांना गड-किल्ले, समुद्रकिनारे धबधबे आता खुणावू लागले आहेत. पुढील कालावधीत पाऊस सक्रिय झाल्यानंतर वर्षासहलींना सुरुवात होणार आहे. या कालावधीत अति उत्साही पर्यटकांकडून अशा ठिकाणी हुल्लडबाजी केली जाते. गेल्या दोन वर्षात १५ जणांना आपला जीव गमावावा लागला आहे. यासाठी आता जिल्हा प्रशासन सतर्क झाले आहे. गावपातळीपासून नियोजन करण्यात येत असून त्यांची अशा पर्यटनस्थळांवर करडी नजर राहणार आहे.

जिल्ह्यातील गड किल्ले, समुद्रकिनारे, धबधबे यासह विविध ठिकाणी पर्यटनासाठी येणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी असून त्यांच्या सुरक्षिततेसाठी उपाय केले जाणे गरजेचे आहेत. अधिकाऱ्यांनी यासाठी गाव तहसील व उपविभागीय स्तरावरील पातळीवरील

•> पान २ वर

**रायगड जिल्ह्याला विस्तीर्ण आणि स्वच्छ समुद्र किनारे लाभले आहेत. तसेच पावसाळ्यामध्ये येथील धरणे दुथडी भरुन वाहतात. वर्षा सहलीसाठी पर्यटकांची अशा ठिकाणांना अधिक पसंती असते. मात्र पर्यटकांच्या अतिउत्साहीपणामुळे २०२३ या वर्षात पाच पर्यटकांना प्राण गमवावा लागला आहे, तसेच २०२४ च्या पावसाच्या सुरुवातीलाच सहा जणांना प्राण गमवावा लागला आहे. त्यामुळे प्रशासनामार्फत विविध पर्यटळस्थळांवर बंदी घालण्यात येते. वर्षा सहलीसाठी पर्यटक नवीन धबधबे, नद्यांचा शोध घेऊन बंदीविरोधात पळवाट काढण्याचा प्रयत्न करतात.**

### या ठिकाणी राहणार प्रशासनाची नजर

मान्सून पर्यटनाच्या अनुषंगाने विविध तलाव, धबधब्याच्या ठिकाणी मोठयाप्रमाणात पर्यटक येत असतात. या व मागील वर्षी काही ठिकाणी अपघात होवून पर्यटकांच्या मृत्यु होण्याच्या दुर्घटना घटना घडल्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर प्रबळगडाच्या धर्तीवर इरशाळ गड, पेब किल्ला, माणिक गड (रसायनी), कोथळी गड (पेठ गड), सागरगड व इतर पर्यटकांच्या गर्दी होणाऱ्या वन विभागाच्या हद्दीमधील गड-किल्ल्यांवर स्थानिक तरुणांना गाईडचे प्रशिक्षण देणे, पर्यटकांना स्थानिक गाईड सोबत नेणे बंधनकारक करणे, पर्यटकांना गड-किल्ले, धबधबा, धरणे, पाणी प्रकल्प, समुद्र किनारी अन्य धोकादायक ठिकाणी सेल्फी घेण्यास प्रतिबंध करण्याबाबत चर्चा करून सूचना देण्यात आल्या.

**आजचा अग्रलेख**
**कुछ भी नही बदला है**

### वेधक

#### अपघातात तरुणाचा मृत्यू

**पनवेल :** पनवेलजवळील जेएनपीटी ते पळस्पे रोडवरील गव्हाण फाट्याकडून सीबीडीकडे जाणाऱ्या रोडवर बेदरकारपणे उभ्या करून ठेवलेल्या ट्रेलरला स्कुटीची पाठीमागून धडक बसल्याने अपघात झाला. यामध्ये तरुणाचा मृत्यू झाला. ट्रेलर चालक संजयकुमार सिंग (३७) याने वाहतुकीच्या नियमाकडे व रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून रस्त्यावर ट्रेलर थांबविल्याने जयेंद्र पवार (१९) हा त्यावेळी पाठीमागून स्कुटीवरुन चालला असताना ट्रेलरला धडकल्याने झालेल्या अपघातात तो गंभीररित्या जखमी होवून मृत्यू झाला आहे. या अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

#### आगीत नऊ गुरांचा मृत्यू

**महाड :** महाड तालुक्यातील देशमुख कांबळे या गावी मंगळवारी मध्यरात्री दीडच्या सुमारास गुरांच्या गोठ्याला लागलेल्या आगीत नऊ गुरांचा मृत्यू झाला. ऐन शेतीच्या हंगामात ही घटना घडल्याने गावातील दोन शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. देशमुख कांबळे या गावातील गोठ्याला मध्यरात्री अचानक आग लागली. आग लागल्याचे ग्रामस्थांच्या उशिराने निदर्शनास आले. तोपर्यंत गोठा जळून खाक झाला होता. गोठ्यामध्ये देशमुख कांबळे येथील शेतकरी प्रभाकर देशमुख व किशोर देशमुख यांची गुरे बांधलेली होती. आग विझवण्यासाठी स्थानिक ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले. मात्र यामध्ये नऊ गुरांचा मृत्यू झाला. संपूर्ण गोठा आगीत जळून खाक झाला. अग्निशमन दलाकडून आग विझवण्यात आली आहे. गुरांचा होरपळून मृत्यू होत असल्याचे पाहिल्याने मालक व त्यांच्या कुटुंबियांनी हंबरडा फोडला. महसूल विभागाकडून नुकसानीचा पंचनामा करण्यात आल्याचे तहसीलदार महेश शितोळे यांनी सांगितले. आगीचे निश्चित कारण समजू शकले नाही.

### शेकापने सार्वजनिक बांधकाम अधिकाऱ्यांचे वेधले लक्ष

# पाल्हे पूल धोकादायक



#### बुधवारपासून कामाला सुरुवात

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील नागाव-पाल्हे पुलाचा एक भाग खचला असून दगड निघाले आहेत. त्यामुळे हा पूल वाहतुकीस धोकादायक असल्याची भिती निर्माण झाली आहे. या नादुरुस्त पुलाकडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे लक्ष वेधण्याचे काम नागाव ग्रामपंचायतीच्या सरपंच हर्षदा मयेकर यांनी केले आहे. त्यांनी कार्यकारी अभियंता यांना सोमवारी (दि.२४) निवेदन दिले आहे. त्यानंतर उध्दव ठाकरे गटाचे जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांनीदेखील जीर्ण

•> पान २ वर



"नागाव हे पर्यटनदृष्टया महत्वाचे ठिकाण आहे. वर्षाला लाखो पर्यटक नागावमध्ये येतात. नागावसह रेवदंडाकडे ये-जा करण्यासाठी पर्यायी रस्ता म्हणून नागाव-पाल्हे पुलाकडे पाहिले जाते. हा पुल खूप जूना असून अरुंद आहे. हजारो वाहने या पुलावरून जातात. जीर्ण झालेल्या पुलाच्या जागी नवीन पूल बांधण्यात यावा. पूल बांधणे काळाची गरज आहे. पुलाला भगदाड पडलेली बाब सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निदर्शनास आणून दिली आहे. त्याची दखल घेत त्यांच्याकडून बुधवारी सकाळी कामाला सुरुवातदेखील करण्यात आली आहे. त्यामुळे तहसीलदार यांच्यासह बांधकाम अधिकाऱ्यांचे आभार व्यक्त केले जात आहेत. -हर्षदा मयेकर, सरपंच, नागाव"



# समुद्रात लाटांचा जोर वाढला

**। मुरुड जंजिरा । प्रतिनिधी ।**

समुद्र किनाऱ्यांवर लाटांचा जोर वाढला असून जोराचे वारे वाहत आहेत. किनाऱ्यावर लाटांचा मारा होत आहे. अलिकडेच कोकण किनारपट्टीला धोक्याचा इशारा दिला होता. मात्र उधाणाच्या मोठ्या भरतीमुळे तालुक्यातील सर्वच समुद्र किनाऱ्यांवर कालपासून समुद्राच्या मोठमोठ्या लाटा उसळू लागल्या आहेत. किनारी भागात वाऱ्याचा वेगही वाढलेला पाहायला मिळाला. दरम्यान, लाटांचा जोर वाढल्याने किनारपट्टीवरील नागरिकांना तसेच पर्यटकांना सतर्कतेचा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे. दरम्यान, बुधवारपासून रायगड जिल्ह्यात पावसाने सुरूवात केली असल्याने नदी आणि नाल्यांना पाडी आले आहे.

## 'खोके सरकारच्या निरोपाचं अधिवेशन'

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

मुंबईतील पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघातील उमेदवार शिवसेनेच्या पाठिशी उभे राहतील याची मला खात्री आहे. पदवीधर मतदारसंघातील आमचे उमेदवार अनिल परब यांचा विजय आता उघड आहे. उद्यापासून राज्य विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन होत आहे. महायुतीच्या खोके सरकारचे हे निरोपाचे अधिवेशन आहे. उद्या माध्यमांशी बोलताना राजकीय विषयाबाबत भूमिका मांडेन, अशी प्रतिक्रिया शिवसेना उबाठा गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिली.

•> पान २ वर

#### उद्धव ठाकरेंचा टोला

**उद्यापासून पावसाळी अधिवेशन सुरू होत असल्याच्या पार्श्वभूमीवर आज सरकारतर्फे चहापानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. मात्र विरोधकांनी परंपरेनुसार चहापानावर बहिष्कार घातला. शेतकऱ्यांचे प्रश्न, कायदा व सुव्यवस्था आणि भ्रष्टाचारासारख्या विषयांवर सरकार गंभीर नाही, असा आरोप विरोधकांनी केला आहे.**

## राहुल गांधी यांची विरोधी पक्षनेतेपदी निवड

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांची लोकसभेतील विरोधी पक्षनेतेपदी निवड करण्यात आली आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय महासचिव के. सी. वेणुगोपाल यांनी ही घोषणा केली आहे. राहुल गांधी हे रायबरेलीचे खासदार आहेत. २०१४ आणि २०१९ मध्ये संख्याबळाच्या अभावामुळे लोकसभेला विरोधी पक्षनेते पद मिळाले नव्हते. तब्बल दहा वर्षानंतर आता राहुल गांधी हे देशाचे लोकसभेचे नवे विरोधी पक्षनेते असणार आहेत.

विरोधी पक्षनेत्याच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासोबतच विरोधी पक्षनेता अनेक संयुक्त संसदीय पॅनेल आणि निवड समित्यांचाही एक भाग असतो. यामध्ये ईडीचे संचालक, केंद्रीय दक्षता आयुक्त, भारतीय निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयुक्त, मुख्य माहिती आयुक्त, लोकायुक्त तसेच राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे अध्यक्ष आणि सदस्य

•> पान २ वर



#### तिसऱ्यांदा मिळाले पद

**गांधी कुटुंबाला तिसऱ्यांदा हे पद मिळाले आहे. याआधी सोनिया गांधी विरोधी पक्षनेत्या राहिल्या आहेत. १३ ऑक्टोबर १९९९ ते ६ फेब्रुवारी २००४ पर्यंत त्यांनी विरोधी पक्षनेत्याची जबाबदारी सांभाळली. त्याशिवाय राजीव गांधी यांनीही १८ डिसेंबर १९८९ ते २४ डिसेंबर १९९० पर्यंत विरोधी पक्षनेते राहिले आहेत. आता लोकसभेतील पक्षनेतेपदाची संधी राहुल गांधी यांना मिळाली आहे.**

## लोकसभा अध्यक्षांच्या निवडीवर तृणमूल काँग्रेसचा आक्षेप



**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

लोकसभा अध्यक्ष म्हणून ओम बिर्ला यांची निवड करण्यात आली आहे. काँग्रेसचे के. सुरेश हेसुद्धा या पदाच्या शर्यतीत होते. परंतु, आवाजी मतदानात ओम बिर्ला यांची निवड झाली. दरम्यान, या निवडणुकीवर तृणमूल काँग्रेसने आक्षेप घेतला आहे. सभागृहाबाहेर येऊन तृणमूल काँग्रेसचे खासदार अभिषेक बॅनर्जी यांनी माध्यमांशी संवाद साधून भाजपावर टीका केली आहे.

अठराव्या लोकसभेचे पहिलेच अधिवेशन सुरू आहे. यंदा संसदेत विरोधकांचे संख्याबळ वाढल्यामुळे विरोधकांनी सरकारला घेरण्याची रणनीती आखल्याचे दिसते. मंगळवारी (दि.२५) लोकसभा अध्यक्षांची बिनविरोध निवड करण्याबाबत सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात चर्चा फिस्कटल्यानंतर अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी अध्यक्षपदासाठी निवडणूक झाली.

•> पान २ वर

# कोकणात ६७.०६ टक्के मतदान

### १३ उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद



**। रायगड । खास प्रतिनिधी ।**

कोकणपदवीधरमतदारसंघाच्या निवडणुकीत रायगडसह कोकणात ६७.०६ टक्के मतदान झाले आहे. १३ उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बुधवारी बंद झाले. रायगड जिल्ह्यातील ८१ मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. १ जुलै रोजी नवी मुंबईतील नेरळ येथील आगरीकोळी संस्कृती भवनमध्ये मतमोजणी होणार आहे.

सकाळी सात वाजता मतदानाला सुरुवात झाली. महाविकास आघाडी विरुध्द महायुती अशी लढत झाली आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार रमेश किर आणि महायुतीचे निरंजन डावखरे या दोन्ही उमेदवारांनी विजयाचा विश्वास व्यक्त केला आहे.

पहिल्या दोन तासात सकाळी नऊ वाजेपर्यंत ७ टक्केच मतदान झाले होते. त्यानंतर मतदार मतदानासाठी बाहेर

•> पान २ वर

## गागोदे खिंडीत मृतदेह सापडला

**। पेण । प्रतिनिधी ।**

गागोदे खिंडीतील जंगलामध्ये एकाचा मृतदेह सापडला. याच जंगलभागामध्ये शिना बोरा हत्याकांड घडले होते. आता सापडलेल्या मृतदेहामुळे पुन्हा एकदा गागोदे खिंड चर्चेत आली आहे. धोंडीराम लेंडे असे मृताचे नाव आहे. धोंडीराम यांचा मृतदेह दगडामध्ये अडकल्याचे आढळले. धोंडीराम या जंगलात कोणत्या कारणासाठी आले. याबाबतचे गुढ उकलण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे. सदरच्या घटनेची नोंद पेण पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## एमएसईबी उरण कार्यालयावर शेकाप धडकणार

### ९ जुलैला जाहीर मोर्चाचे आयोजन



**। उरण । वार्ताहर ।**

उरण तालुक्यातील विद्युत मंडळाने उन्हाळ्यासह पावसाळ्यात विजेचा सततचा खंडित प्रवाह करून नागरिकांच्या जिवाशी खेळ मांडला आहे.

हजारो नागरिकांच्या वाढत्या तक्रारींचा विचार करून शेतकरी कामगार पक्षाच्या कार्यकर्त्यांनी उरण एमएसईबी कार्यालयावर भव्य निषेध मोर्चा आयोजित केला असल्याचे शेकाप उरण तालुका चिटणीस विकास नाईक यांनी अर्ज देऊन जाहीर केले.

यावेळी शेकाप ज्येष्ठ नेते रायगड भूषण प्रा. एल.बी. पाटील, उरण महिला चिटणीस सीमा घरत, रमाकांत पाटील, शहर महिला अध्यक्षा नयना पाटील, सिताराम नाखवा, विनोद पाटील, रंजना पाटील तसेच शेकाप कार्यकर्ते उपस्थित होते.

तालुक्याच्या गावागावांतील विजेचे खांब जीर्ण झाले आहेत. विजेच्या तारा तुटल्या आहेत. पावसाळ्यात तार पडून मोठी जीवितहानी होण्याची दाट शक्यता आहे. तसेच ग्राहकांना भरमसाठ बिले येत असल्याने नागरिक मेटाकुटीला आले आहेत. लोकात असंतोष माजला आहे. नागरिकांना न्याय मिळविण्यासाठी हा मोर्चा निघणार आहे. आता हा मोर्चा जोरदार काढण्यासाठी पुढच्या आठवड्यापासून कार्यकर्त्यांनी गावोगाव प्रचार सुरू करण्याचे आयोजन केले आहे.

# माथेरानमध्ये भरपावसात पाण्यासाठी उपोषण



**। माथेरान । वार्ताहर ।**

माथेरानमधील श्री राम मंदिरासमोर निसर्ग पॉइंट स्टॉल वेल्फेअर असोसिएशनच्या माध्यमातून शार्लोट लेकच्या स्वच्छतेसाठी बेमुदत उपोषण सुरू करण्यात आले आहे. गेल्या १० वर्षांपेक्षा अधिक काळ होऊनही माथेरानमधील पिण्याच्या पाण्याचा तलाव स्वच्छ करण्यात प्रशासनाला अपयश आले आहे. परिणामी, पावसाळ्यातील दिवसांमध्ये रोगराई वाढत आहे तर अशुद्ध पाण्याचा पुरवठाही होत असल्याच्या निषेधार्थ हे उपोषण सुरू आहे.

निसर्ग पॉइंट स्टॉल वेल्फेअर असोसिएशनने माथेरान नगरपालिकेला अगोदर निवेदन देऊन हा तलाव पावसाळ्यामध्ये स्वच्छ करावा, अशी मागणी केली होती. जून २५ पर्यंत तलाव स्वच्छ न झाल्यास आमरण उपोषण केले जाईल, असा इशाराही दिला होता. परंतु या कालावधीमध्ये काम सुरू न झाल्याने बुधवारपासमन संघटनेचे अध्यक्ष संतोष कदम आमरण उपोषणास बसले आहेत.

शार्लोट तलाव

•> पान २ वर

### पावसाअभावी रोपांची वाढ खुंटली

# भात लावणी लांबणीवर

**। प्रमोद जाधव ।**
**। अलिबाग ।**

**जिल्ह्यामध्ये भाताची रोपे उगवली आहेत. मात्र पाऊस नसल्याने रोपांची वाढ होण्यास अडथळे निर्माण होत आहेत. पाण्याअभावी शेतं कोरडी दिसत आहेत. शेतकऱ्यांना पावसाची प्रतिक्षा लागून राहिली आहे. यंदा पावसाअभावी लावणीची कामे लांबणीवर जाण्याची चिंता शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.**

रायगड जिल्ह्यामध्ये यंदा ९८ हजारहून अधिक हेक्टर क्षेत्रामध्ये भात लागवडीचे नियोजन आहे. मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून भात पेरणीला सुरुवात झाली. जून महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत ही कामे पूर्ण झाली. जिल्ह्यामध्ये भाताच्या एकूण क्षेत्रापैकी दहा टक्के क्षेत्रामध्ये म्हणजे १० हजार हेक्टर क्षेत्रामध्ये पेरणीची कामे पूर्ण झाली. जिल्ह्यातील काही भागात रिमझिम पाऊस पडल्याने भाताची रोपे चांगल्या पध्दतीने उगवली. काही ठिकाणी लावणी योग्य रोपे तयार झाली आहेत. तर काही ठिकाणी पावसाअभावी रोपांची वाढ होण्यास उशीर होत आहे. जिल्ह्यातील काही भागांमध्ये भाताची रोपे

•> पान २ वर

#### मजुरीचे दर वाढण्याची शक्यता

**लावणीच्या कामासाठी दिवसाला सुमारे साडेतीनशे रुपये मजूरी दिली जाते. मात्र लावणीची कामे लांबणीवर गेल्यावर मजूरकर मिळताना अडचणी येणार आहेत. त्यामुळे मजुरीच्या दरात वाढ होण्याची शक्यता आहे.**



#### मजूरकरांची समस्या निर्माण होण्याची शक्यता

**भाताची रोपे तयार झाली आहे. लावणीच्या कामाची प्रतीक्षा लागून राहिली आहे. मात्र पाऊस नसल्याने ही कामे लांबणीवर जातील. त्याचा परिणाम शेतकऱ्यांना बसण्याची भिती व्यक्त केली जात आहे. पाऊस सुरु झाल्यावर सर्वजण लावणीची कामे सुरु करतील त्यामुळे मजूरकर मिळणे कठीण होणार आहे. मजूरकरांचा तुटवडा जाणवणार असल्याचे शेतकऱ्यांकडून सांगण्यात आले आहे.**

"भात बी लागवडीनंतर रोपे तयार झाली आहेत. अनेक ठिकाणी लावणी योग्य रोपे झाली आहेत. मात्र पाऊस नसल्याने लावणीची कामे थांबली आहेत. लावणी लांबणीवर गेल्यास मजूर मिळणे कठीण होणार आहे. त्यात मजूरीही वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पावसाची प्रतीक्षा लागून राहिली आहे. – सतिश म्हात्रे, शेतकरी अलिबाग"

पान १ वरून

## वर्षा सहलींवर प्रशासनाची करडी नजर

यंत्रणेच्या माध्यमातून कार्यवाही करावी असे निर्देश जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिले आहेत.जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यालयात जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अंतर्गत आढावा बैठक पार पडली. या प्रसंगी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, विविध शासकीय यंत्रणांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. तसेच जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे ऑनलाईन बैठकीत सहभागी झाले होते.

मान्सून पर्यटन आणि पावसाळा या पार्श्वभूमीवर दुर्घटनांच्या होऊ नये यासाठी प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, तलाठी आदींच्या सहभागाने गाव पातळीवर समिती स्थापन करण्यात यावी. या समितीद्वारे सदर गावाच्या परिसर हद्दीतील पर्यटन स्थळ, तलाव, धबधबे, समुद्रकिनारे अशा जागांवर जीवित हानी टाळण्यासाठी उपाययोजना कराव्यात. उपविभागीय अधिकाऱ्यांसह तहसीलदार, गटविकास अधिकारी, पोलीस अधिकारी यांनी नागरिकांना विविध माध्यमातून सतर्क करावे असे सुचित केले.

यावेळी पोलीस अधीक्षक घार्गे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.बास्टेवाड यांनी महत्त्वाच्या सूचना केल्या. मोरबे धरणाची सुरक्षा व्यवस्था, काशीद समुद्रकिनारा येथे पर्यटक सुरक्षेसाठी वॉच टॉवर उभारणे, विविध धबधबे गड-किल्ले आदीं ठिकाणी संबंधित विभागांच्यावतीने उपाययोजना करणेबाबत चर्चा करण्यात आली.

याप्रसंगी उपस्थित उपविभागीय अधिकारी मंगेश चव्हाण, सार्वजनिक बांधकाम कार्यकारी अभियंता रूपाली पाटील, कार्यकारी अभियंता महेश नामदे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अंबादास देवमाने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.मनीषा विखे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक यांनी बैठकीत सहभागी होत विविध प्रकारची माहिती दिली.

## पाल्हे पुल धोकादायक

पुलाची दुरुस्ती करण्याचे मागणी पत्र बुधवारी (दि.२६) दिले आहे. यावेळी तालुका प्रमुख शंकर गुरव, उपजिल्हा संघटक अजित पाटील, जिल्हा प्रवक्ता विकास पिंपळे उपास्थित होते.

तालुक्यातील नागाव-पाल्हे हा जुना पूल आहे. या पुलावरून रेवदंडा, नागाव, काशीद, मुरूड, अलिबागकडे जाणाऱ्या प्रवाशांची संख्या प्रचंड आहे. त्यात पर्यटकांच्या वाहनांची वर्दळ या मार्गावर अधिक आहे. हा पूल जीर्ण झाल्याबाबत अनेकवेळा शेतकरी कामगार पक्षाने आवाज उठविला.त्यामुळे या पुलावरून अवजड वाहतुकीला बंदी करण्यात आली.

नागाव-पाल्हे या पुलाचा काही भाग ढासळला आहे. पुलाच्या बंधाऱ्याला भलेमोठे भगदाड पडले आहे. या भगदाडामुळे पूल पूर्णतः नादुरुस्त अवस्थेत आहे. या नादुरुस्त पुलामुळे मोठी हानी होण्याची भिती आहे. याबाबत शेतकरी कामगार पक्षाच्या नागावच्या सरपंच हर्षदा मयेकर यांनी सोमवारी कार्यकारी अभियंता सुखदेवे यांची भेट घेतली. या जीर्ण पुलाबाबतची माहिती देऊन हा पूल कोसळल्यास अनेक गावांचा संपर्क तुटण्याची भिती आहे.

या मार्गावरून येणाऱ्या प्रवाशांची मोठी गैरसोय होणार आहे. ही बाब त्यांच्या निदर्शनास आणून दिली. हा पूल तातडीने दुरुस्त करा, अशी मागणी त्यांनी यावेळी निवेदन देऊन केली. यानंतर शिवसेना उध्दव ठाकरे गटाचे जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे यांनीदेखील संबंधित अधिकाऱ्यांची भेट घेऊन पूल तातडीने दुरुस्त करण्यात यावा, अशी मागणी बुधवारी निवेदनाद्वारे केली आहे.

## लोकसभा अध्यक्षांच्या निवडीवर तृणमूल काँग्रेसचा आक्षेप

एनडीएकडून ओम बिर्ला तर इंडिया आघाडीकडून केरळमधील काँग्रेसचे खासदार के. सुरेश निवडणुकीसाठी उभे होते. विरोधकांकडे पुरेसे संख्याबळ नसले तरी सरकारने उपाध्यक्ष देण्यास विरोध केल्यामुळे इंडिया आघाडीने ही निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला असल्याचे काँग्रेस नेत्यांकडून सांगण्यात आले.

अभिषेक बॅनर्जी म्हणाले,'नियमानुसार सभागृहाच्या कोणत्याही सदस्याने विभाजनाची मागणी केल्यास, हंगामी अध्यक्षकांनी परवानगी दिली पाहिजे. संसदेतील लाईव्ह टीव्ही फुटेजमध्ये तुम्ही पाहू शकता की विरोधी पक्षातील सदस्यांनी मतविभाजनाची मागणी केली होती. मतदानासाठी प्रस्ताव ठेवण्याची मागणी केली होती. परंतु, मतदानासाठी प्रस्ताव न ठेवता आवाजी मतदान घेण्यात आले. सत्ताधारी पक्षाकडे, भाजपाकडे संख्याबळ नाही. याचा हा स्पष्ट पुरावा आहे. हे सरकार आकड्यांशिवाय चालत आहे. हे बेकायदा, अनैतिक आणि असंवैधानिक सरकार आहे.'

राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उमेदवार ओम बिर्ला यांची लोकसभेच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडलेला प्रस्ताव आवाजी मतदानाद्वारे मंजूर करण्यात आला. काँग्रेसनेही के. सुरेश यांना या शर्यतीत ठेवलं होतं. परंतु, मतविभागणी झाली नसल्याने विरोधकांनी यावर प्रचंड टीका केली आहे. परंतु, मतविभागणीसाठी विरोधकांनी दबाव आणला नाही, असा आरोप सत्ताधाऱ्यांकडून केला जातोय. त्यावर अभिषेक बॅनर्जी म्हणाले की, ५०० पैकी एकाने जरी मतविभागणीची मागणी केली तरी मतविभाजन करावं लागतं. हाच नियम आहे. त्यामुळे मतविभाजनास का नकार देण्यात आला याचा खुलास हंगामी अध्यक्षांनी केलाच पाहिजे.

## राहुल गांधी यांची विरोधी पक्षनेतेपदी निवड

यांची नियुक्ती करण्यासाठी समित्यांचा समावेश आहे. विरोधी पक्षनेते म्हणून राहुल गांधी यांचा या निर्णयांमध्ये थेट हस्तक्षेप असेल. या समित्यांच्या निर्णयांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबतच विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचीही संमती आवश्यक असेल.

राहुल गांधी सीबीआय आणि ईडी अशा इतर यंत्रणांबाबत सरकारला कोंडीत पकडू शकतात. अशा परिस्थितीत आता या एजन्सींच्या उच्च पदांवर नियुक्ती करण्यातही त्यांची महत्त्वाची भूमिका असणार आहे. यासोबतच विरोधी पक्षनेते म्हणून राहुल गांधी हे लेखा समितीचे प्रमुखही असतील. विरोधी पक्षनेतेपद मिळाल्यानं नियमानुसार राहुल गांधींना ते सर्व अधिकार मिळतील जे एका कॅबिनेट मंत्र्याला दिले जातात.

### काँग्रेसला १० वर्षांनी लोकसभेत विरोधी पक्षनेतेपद

**सुषमा स्वराज २००९ ते २०१४ या काळात लोकसभेत विरोधी पक्षनेत्या होत्या. मात्र, त्यांच्यानंतर आता हे पद राहुल गांधी यांच्याकडे गेले आहे. तब्बल १० वर्षांनी लोकसभेत विरोधी पक्षनेतेपद काँग्रेसला मिळालं आहे. १० वर्षे विरोधी पक्षनेते न राहण्यामागचे कारण म्हणजे २०१४ आणि २०१९ च्या निवडणुकीत कोणत्याही विरोधी पक्षाचे ५४ खासदार विजयी झाले नाहीत. नियमांनुसार, विरोधी पक्षनेता होण्यासाठी लोकसभेच्या एकूण जागांपैकी १० टक्के जागा म्हणजेच ५४ खासदार असणे आवश्यक आहे. दोन्ही वेळा काँग्रेसकडे तेवढे खासदार नव्हते. मात्र, यावेळी काँग्रेसला ९९ जागांवर विजय मिळवता आला आहे.**

## 'खोके सरकारच्या निरोपाचं अधिवेशन'

मुंबई पदवीधर मतदारसंघासाठी बुधवारी उद्धव ठाकरे यांनी रश्मी ठाकरे, आदित्य ठाकरे आणि तेजस ठाकरे यांच्यासह मतदानाचा हक्क बजावला. यावेळी माध्यमांशी बोलत असताना त्यांनी महायुती सरकावर टीका केली. निवडणूक असल्यामुळे राजकीय विषयावर भाष्य करणार नाही, असे सांगतानाच उद्यापासून सुरू होणाऱ्या अधिवेशनात राजकीय भाष्य करेन, असेही त्यांनी जाहिर केले.

## माथेरानमध्ये भरपावसात पाण्यासाठी उपोषण

हे माथेरान नगरपालिकेच्या मालकीचे असून अमृत २ या कार्यक्रम ंतर्गत माथेरान नगर परिषदेकडून शार्लेट तलाव सुशोभीकरण करण्याकरिता ४ कोटी ९९ लाख ८२ हजार इतके अंदाजपत्रक सादर करण्यात आले होते.

अधीक्षक अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, पनवेल कार्यालयाकडून त्यास ६ फेब्रुवारी २०२३ रोजी तांत्रिक मान्यता देण्यात आली होती. सदर अंदाजपत्रक तलावातील गाळ काढण्याचे व वाहतूक करून टाकणे तसेच तलावातील गेट व ब्रिज बाजूच्या दुरुस्तीसाठीची तरतूद होती. त्यास प्रशासकीय मंजुरी मिळाली होती.

त्याचप्रमाणे माथेरान नगर परिषदेस राज्य शासनाने राज्य सरोवर संवर्धन योजनेअंतर्गत माथेरान येथील शार्लेट तलावास पर्यावरणदृष्ट्या संवर्धन व संरक्षण करण्यासाठी ७ मार्च २००७ रोजीच्या शासन निर्णयानुसार ३६२.६५ लक्ष इतक्या मंजूर निधीतील राज्य हिश्शापोटी रुपये ३२६.३८ लक्ष इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती.

मंजूर रकमेपैकी २ कोटींचा निधी आतापर्यंत वितरीत केला असून माथेरान नगर परिषदेच्या २ मार्च २०२३ रोजीच्या पत्रानुसार उर्वरित कामे करण्यासाठी १ कोटी रुपयांचा निधी नगर परिषदेस उपलब्ध करून दिला असल्याने २७ मार्च २०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार दिसून येत आहे. परंतु या निधीचा वापर तलावाच्या स्वच्छतेसाठी व सुशोभीकरणासाठी न होता इतरत्र वापरला गेला किंवा काहीतरी मोठा घोटाळा झाला असल्याची चर्चा सध्या शहरात सुरु आहे.

निसर्ग पॉईंट स्टॉल वेल्फेअर असोसिएशनने वारंवार तलाव स्वच्छतेकडे दुर्लक्ष करणाऱ्या शासनाविरोधात दंड थोपटले असून माथेरानला येणाऱ्या पर्यटकांना व स्थानिकांना अस्वच्छ पाणी पुरवठा होत असल्याने हा तलाव तातडीने स्वच्छ व्हावा, यासाठी उपोषणाचे हत्यार उपसले आहे. या उपोषणास माथेरानमधील सर्वच स्तरातून पाठिंबा मिळत आहे. यावेळी संघटनेचे योगेश शिंदे, अविनाश गोरे, सीमा कदम, जगदीश कदम, विजय सावंत व अन्य सदस्य उपस्थित होते.

## भात लावणी लांबणीवर

पिवळी पडण्याची भिती निर्माण झाली आहे. त्यामुळे काही जण फवारणीद्वारे रोपांना पाणी घालत आहेत. भात लावणीसाठी रोपे तयार झाली असताना पावसाअभावी ही कामे लांबणीवर जाण्याची शक्यता वर्तविली आहे. शेतांमध्ये पाणी नसल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत. शेतकऱ्यांना पावसाची प्रतीक्षा लागून राहिली आहे. जिल्ह्यात बुधवारी दुपारपासून पावसाने सुरुवात केली. हा पाऊस असाच सुरु राहिल्यास लावणीची कामे तातडीने सुरू होणार असल्याची चर्चा ग्रमीण भागात ऐकावयास मिळाली.

## कोकणात ६७.०६ टक्के मतदान

पडल्याचे दिसून आले. ११ वाजेपर्यंत १९.८ टक्के मतदान झाले. दुपारी १ वाजेपर्यंत ३५.०७ टक्के मतदारांनी मतदान केले. तर दुपारी ३ वाजेपर्यंत ४८.०५ टक्के मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला होता. सायंकाळी ५ वाजेपर्यंत ६१.०९ टक्के मतदान झाले. शेवटच्या एक तासात मतदानाचा टक्का वाढला. मतदानाची टक्केवारी ६७.०६ इतकी वाढली. दरम्यान, निवडणूक शांततेत व सुरळीत पार पडावी यासाठी मतदान केंद्रांवर मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. कोकणातील पाच जिल्ह्यामध्ये कोकण पदवीधर मतदारसंघासाठी आपला प्रतिनिधी निवडून यावा यासाठी राजकीय पक्षानी प्रतिष्ठा पणाला लावल्याचे चित्र पाहावयास मिळाले.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील हे खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री. शार्दुल शिवाजीराव पवार व प्रिया शाम गद्रे रा. ठाणे (प) यांचे कडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकतींचे मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मौजे - करचुंडे ता. सुधागड, जि. रायगड येथिल ग्रुप ग्रामपंचायत वऱ्हाड जांभुळपाडा हद्दीतील खुल्या जागेच्या मिळकतींचे वर्णन**

| मालमत्ता क्र. | मिळकत वर्णन | क्षेत्र (चौ.फुट) |
|---|---|---|
| ६९५ | खुली जागा/मोकळी जागा | २९००० |
| ७०४ | खुली जागा/मोकळी जागा | ८००० |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीच्या मालकांनी आमचे अशिलास दिली असून, मिळकतीचे मालक आमचे अशिलांचे लाभांत खरेदीखत करून देणार आहेत. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : २७/०६/२०२४

सही /-
**ॲड. नोएल सॅमसन चिंचोलकर**
मु.पो. पाली एकतापथ,
ता. सुधागड, जि. रायगड, ४१०२०५
मो. नं. ९२७१९२३९०३

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- हार्डवेअर दुकानात मांडवा येथे मुलगी कामाला पाहिजे. मो. ८००७८९३२३२, ९४२१९५४३४८
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. १. वेटर, २. नाश्ता बनवणारा कूक, ३. हाऊस कीपिंग, २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी संपर्क साधावा. (व्हॉटसअॅप वर मेसेज करावा.) ८४०८८२९५५५, ७८७५८६६५५५
- Vacancies for office staff for Office in Alibag Fresh graduates required For interview Call 9422383099 Between 11.am to 6 pm
- पी.एन.पी मध्ये गाळा भाड्याने देणे आहे. साबु हॉस्पिटल बिल्डींग, कलावती भाजी भंडारच्या बाजुला संपर्क - ९६०४१३८८२६/७३०४८५२३१५
- वाडगाव फाटा येथे कॉटेजमध्ये काम करण्यासाठी जोडपे पाहिजे. मो.९८२२९३८४४४
- Data Entry साठी Ladies पाहिजे Tally ERP 9 येणे आवश्यक. त्वरित संपर्क साधावा. कामाचे ठिकाण : धरमतर चेक पोस्ट कामाची वेळ : ९ ते ५.३०, पगार: ८,००० ते १०,०००. संपर्क : ९०२८७४९२९२ /८३९०५५१९३

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स*



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

### जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस हया नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील नमूद वर्णनाची मिळकत, सदर बिनशेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सुहास जनार्दन दवे यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाची बोलणी संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलांदरम्यान झालेली आहेत. खालील नमूद मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहिर नोटीस प्रसिध्द करीत आहोत.

संदर्भित बिनशेती जमीन मिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहित असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्या दिनांकापासून १४ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानीशी देवून माझी खात्री पटवून दयावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतींचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन कं. | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| चेंढरे, ता. अलिबाग, जि.रायगड | ५९/२/३ | ०-०२-८१ | ५.६२ |

अलिबाग,
दि. २७/०६/२०२४

सही/-
**ॲड. महेश सुहास म्हात्रे**
MAHESH S. MHATRE
ADVOCATE
ENROLLMENT No. MAH/5773/2006
Rituraj Plaza, Ground Floor,
Flat No. 1. Ch. Shivaji Chouk,
Near Gawade Optics,
Alibag Raigad

### जाहीर नोटीस

दिनांक : २६/०६/२०२४

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे नाडसूर ता. सुधागड जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे नाडसूर ता. सुधागड जि. रायगड**

| कब्जेदाराचे नांव | गट क्रमांक | क्षेत्र हे आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| श्री. सुरेश तुळशीराम पारगांवकर | ७३४/१ | ०-५६-०० | ०-२५ |

सदर वरील वर्णन केलेली एकूण सर्व मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे कब्जेदार यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर होणारे खरेदी विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा दावा असल्यास या सदरहू मिळकतीचे खरेदी विक्री बाबत तसेच हक्क हितसंबंध, मालकी वहीवाट, पोटगी बक्षिसपत्र मृत्यूपत्र, साठेकरार अथवा कोणाचेही काही हक्क हितसंबंध वहीवाट अथवा सदर मिळकतीचे ताबे कब्जा वहीवाट असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून संबंधीत तक्रारदार याने आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुरव्यासहीत ७ दिवसांचे कालावधीत खालील पत्त्यावर नोंदवावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे. असे समजून आमचे अशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण :- पाली - सुधागड
दिनांक :- २६/०६/२०२४

सही /-
**श्री. राहुल जे.भंडारी**
ॲडव्होकेट
रा. पाली ता. सुधागड जि. रायगड
मोबा नं. ९४२३२३२८६२

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकतीचे विद्यमान मालक बळीराम काशीनाथ भोसले वगैरे यांच्या कडुन कायम विकत घेण्याचे ठरविले आहे व तशी बोलणी केलेली आहेत. विकत घेणाऱ्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | ग.नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| परहुर | १७२ | ०-३२-९०<br>पो.ख. ०-०१-००<br>एकुण ०-३३-९० | ६.७५ |

वरील तपशिलात नमुद केलेली मिळकत ही या जाहिर नोटीसीचा विषय आहे.

सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असल्याचा दावा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलाना केलेला आहे.

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही ताबा कुळवहिवाट, बयाणा पावती. साठेकरार, गहाण, बोजा, बक्षिस, दान, जप्ती, लिज वहिवाट अथवा अन्य प्रकारचा कसलाही हक्क व हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती कागदोपत्री पुराव्यासह सादर कराव्यात. अन्यथा मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहित धरुन सदरचा व्यवहार आमचे अशिल पुर्ण करतीलव मागाहुन आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी. कळावे.

अलिबाग,
दिनांक : २५/०६/२०२४

सही,
ॲडव्होकेट
**ॲड. निखिल राजाराम पाटील**

### जाहीर नोटीस

ॲड. किरण म्हात्रे

**अलिबाग येथील मे. दिवाणी न्यायाधिश व स्तर सो. यांचे कोर्टात**
दिवाणी चौ. अर्ज नं. ९२/२०२४

१) श्री. भगवान सखाराम जांभळे
वय ४९ धंदा शेती
२) श्री. सखाराम हिरु जांभळे
वय ७० धंदा - शेती
३) सौ. पारुबाई सखाराम जांभळे
वय ६७ धंदा - गृहिणी
४) कु. चंद्रावती सखाराम जांभळे — अर्जदार
वय ४५ धंदा - शेती
सर्व रा. पाटणी, पो. कासू,
ता. पेण जि. रायगड
५) सौ. प्रतिभा सागर घासे
पुर्वाश्रमीची प्रतिभा सखाराम जांभळे
वय ३५ धंदा - गृहिणी
रा. मुंढाणी, पो. बेणसे, ता. पेण,
जि. रायगड

विरुध्द

कोणीही नाही — सामनेवाला

**अर्ज भारतीय वारसा अधिनियम १९२५ कलम ३७२ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणेकरीता.**

तमाम जनेतस, या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार क्र. १, ४ व ५ यांचे भाऊ व अर्जदार क्र. २ व ३ यांचा मुलगा कै. किरण सखाराम जांभळे हे मु. पाटणी, पो.कासू ता. पेण, जि. रायगड येथील कायम रहिवाशी होते ते दिनांक ०५/०१/२०२३ रोजी हृदय विकाराच्या धक्याने ग्रामीण रुग्णालय पेण येथे मयत झाले. मृत्यू समयी कै. किरण सखाराम जांभळे हे अविवाहीत होते. परिणामी त्यांना कोणतेही अपत्य नव्हते व नाहीत. त्याच्या मृत्यु पश्चात अर्जदार क्र. १ ते ५ हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. या शिवाय त्यांचे अन्य दुसरे कोणीही वारस नाहीत.

अर्जदार क्र. १, ४ व ५ यांचे भाऊ व अर्जदार क्र. २ व ३ यांचा मुलगा कै. किरण सखाराम जांभळे हे राज्य परिवहन मंडळ रामवाडी रायगड विभाग येथे मॅकेनिक म्हणून कामास कार्यरत होते. परिणामी मृत्यु पश्चात त्यांच्या कामात पुढील वर्णनाची कार्यालयीन रक्कम कार्यालयात जमा आहे.

| अ.क्र. | | रक्कम |
|---|---|---|
| १ | भविष्य निर्वाह निधी | ३९६५३५/- |
| २ | उपदान दाव्या पोटी रक्कम | १८३७५५/- |
| | अशी एकूण | ५,८०,३९०.०० |

त्यास उपरोक्त नमुद अर्जदार क्र. ३ (आई) हिच एकमेव वारस आहे. त्यांच्याशिवाय त्यास अन्य कोणीही वारस नाही. सबब वरील अर्जदार यांनी कै. किरण सखाराम जांभळे यांची कायदेशीर वारस असल्याचा दावा भारतीय वारसा अधिनियम १९२५ कलम ३७२ नुसार वारस प्रमाणपत्र अन्वये मे. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

कै. किरण सखाराम जांभळे यांना त्यांच्या आई व्यतिरीक्त इतर कोणीही वारस अगर अर्जदारांच्या अर्जास हरकत असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत मे. न्यायालयात लेखी हरकत कळवावी अन्यथा सदर अर्जदारांस वारस दाखला देण्याचा हुकूम मे. न्यायालयाकडून पारीत करण्यात येईल.

येणे प्रमाणे आज दिनांक २०/०६/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या सही शिक्यानिशी नोटीस दिली आहे.

सही
**व. लिपीक**
**दिवाणी न्यायालय**
**व स्तर अलिबाग**

(कोर्टाचा शिक्का)

सही
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**व स्तर अलिबाग**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे टेकाळी, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील गट नंबर १०६, क्षेत्र ०-०४-७० हे.आर., पो. ख ०-००-६० हे. आर. एकूण क्षेत्र ०-०५-३० हे. आर., आकार ०.०९ रू. पै. ही भातशेती मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक १) पार्वती लक्ष्मण मढवी, २) सखुबाई लक्ष्मण मढवी, ३) श्री. रमेश पांडुरंग थळे, ४) श्री. शशिकांत पांडुरंग थळे, ५) श्री. रविकांत पांडुरंग थळे, ६) मंदा दत्ताराम पाटील, ७) सुरेखा जयराम ठाकुर, ८) भारती भास्कर पाटील सर्व रा. मु. पो. आवास, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : २६/०६/२०२४

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को. ऑप. हौ. सो.,ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर,ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे मांडवणे ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे मालक जिवनलता नंदकिशोर कागलीवाल यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे. आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ५७ | ३ अ | २.७१.५० पैकी ४४५३.२१४ चौ. मी. | १.२५ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २७/०६/२०२४

**ॲड.सी.बी.ओसवाल**
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर-निमकर अपार्टमेन्ट
बाजारपेठ कर्जत, ता. कर्जत,
जि. रायगड - ४१०२०१

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

### E –TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :-7000031773**<br>**Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-29/2024-2025.**<br>RFx e-tender for work of tree cutting work of various 100kV& 220kV Lines under EHV Lines S/Dn. Panvel – 1 & 2 for the FY – 2024-25 under EHV (O&M) Division Panvel.<br>**Tender amount Limited to Rs. 20,00,000/-,**<br>**EMD amount Rs. 20,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **26.06.2024, 18:00 Hrs. to 03.07.2024, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 03.07.2024 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **04.07.2024 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- https://srmetender.mahatransco.in
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

SD/-
**EXECUTIVE ENGINEER E.H.V.(O&M) DN. PANVEL**

**निवडक**

## पाणी पुरवठा सुरळीत

**पनवेल :** एमजेपीची पाणी पुरवठा करणारी जलवाहिनी फुटल्याने मंगळवारी संध्याकाळपासून पनवेल शहर, नवीन पनवेल, खांदा कॉलनी, कळंबोली तसेच करंजाडे वसाहतींचा पाणी पुरवठा अचानक खंडित झाला होता. दुसऱ्या दिवशी बुधवारी फुटलेली जलवाहनी दुरुस्ती करण्यात एमजेपीला यश आले असले तरी सर्वच भागातील पाणी पुरवठा सुरळीत होण्यासाठी गुरवारी सकाळपर्यंतचा वेळ लागणार असल्याने नागरिकांना ऐन पावसाळ्यात पाणी टंचाईचा सामना करावा लागणार आहे.

## माणगावात दुचाकीची चोरी

**माणगाव :** बाजारपेठेतील गोकुळ निवास एचडीएफसी बँकेसमोरील राहत्या घराच्या पार्किंगमधून दुचाकी चोरीला गेल्याची घटना घडली आहे. संबंधित व्यक्तीने आपली १०,००० रुपये किमतीची होंन्डा पॅशन प्लस दुचाकी (एमएच-०६-एटी-९६१५) संध्याकाळी घराच्या पार्किंगमध्ये पार्क करून ठेवली होती. रात्री नऊ वाजताच्या सुमारास पार्किंगमध्ये दुचाकी आढळून आली नसल्याने ती अज्ञात चोरट्याने चोरून नेली असल्याची खातर जमा करून याबाबत माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## कारगो कारचा अपघात

**खालापूर :** मुंबई - पुणे महामार्गावर खालापूर टोलनाक्याच्या पाठीमागे पुणे लेंथवर चालक ईको कारगो (एमएच-०४-एलक्यु-११६८) घेऊन जात असताना त्याच्या समोरील वाहन चालकाने अचानक ब्रेक मारल्यामुळे कारगोवरील ताबा सुटल्याने समोरील वाहनाला जोरदार धडक बसली. या धडकेत कारगो चालकाला गंभीर स्वरुपाच्या दुखापती होऊन कारगो कारचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल आहे. याबाबत खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह अमित सावंत हे करीत आहेत.

## दुचाकीस्वार जखमी

**नागोठणे :** बेणसेवाडी गावानजिक एसटी बस (एमएच-१४-बीटी-२७६६) चालकाने रस्त्याच्या बाजुला उभी असलेल्या कारला ओव्हरटेक करण्याच्या नादात रस्त्यावरील परिस्थितीकडे दुर्लक्ष करून वाहन अतिवेगाने चालवुन समोरून येणाऱ्या दुचाकीला (एमएच-०६-एजे-४७३८) धडक दिली. या धडकेत दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला असून दोन्ही गाड्यांचे नुकसान झाले आहे. याबाबत नागोठणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहा.फौज प्रमोद कदम हे करीत आहेत.

## हजारोंचा मुद्देमाल चोरीला

**पाली :** सुधागड येथील एका बंद घराच्या तळमजल्यावरील खिडकीला असलेले लोखंडी ग्रिल उपकुन त्यावाटे चोरट्यांनी आत प्रवेश केला. तसेच, पहिल्या मजल्यावरील हॉलच्या खिडकीतून त्यावाटे आत जात एकूण ५२,५०० रुपये किंमतीचा मुद्देमाल अज्ञात इसमाने चोरल्याची घटना घडली आहे. याबाबत पाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार कांचन भोईर हे करीत आहेत.

# ठाकूर, आदिवासी विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**आदीवासी, ठाकूर समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी आदिवासी ठाकूर समाजसेवा संस्था कार्यरत आहे. या संस्थेच्या पुढाकाराने अलिबागमधील कुरुळ येथील सभागृहात आदिवासी, ठाकूर समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. सोहळ्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देऊन शिक्षणाचे महत्व पटवून देण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला.**



यावेळी अलिबागचे गट शिक्षणाधिकारी कृष्णा पिंगळा, कार्यक्रमाचे अध्यक्ष मालू निरगुडे, गणेश निरगुडे, पांडू सुतक, धनाजी शिद, गणपत शिद, काशीनाथ दरवडा, धर्मा गडखळ, यशवंत शिंगवा, बाळाराम शिद, मोहन

### ■ समाजसेवा संस्थेचा स्तुत्य उपक्रम

मेंगाळ, बाळाराम मेंगाळ, पप्पू सोनार, कृष्णा सुतक, यशवंत मेंगाळ, किसन काष्टे, पदमा हंबीर, अर्चना हंबीर, कुशा काष्टे, कल्पेश शिद आदी पदाधिकारी, मान्यवर, सदस्य, विद्यार्थी व समाज बांधव, पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आदीवासी ठाकूर, समाजाच्या उन्नतीसाठी संस्था काम करीत आहे. सामाजिक, क्रिडा अशा वेगवेगळ्या क्षेत्राबरोबरच समाजातील मुला, मुलींच्या शैक्षणिक प्रगतीसाठी देखील संस्थेने काम केले आहे. त्याचाच एक भाग म्हणून नुकताच दहावी, बारावीचा निकाल जाहीर झाला. यामध्ये आदीवासी, ठाकूर समाजातील मुले, मुली चांगल्या गुणांनी उतीर्ण झाले. या विद्यार्थ्यांना अधिक प्रोत्साहन देण्यासाठी संस्थेच्यावतीने कुरुळ येथे गुणगौरव सोहळा आयोजित केला होता. दहावी व बारावीच्या परीक्षेत चांगल्या गुणांना उतीर्ण झालेल्या १२ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व रोख रक्कम देऊन गौरविण्यात आले. उतीर्ण झालेल्या ४७ विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व शालेय साहित्य देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले मालू निरगूडे यांनी संस्थेविषयी गौरवोद्गार काढत असताना समाजातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा कौतूक केले.

> **शिक्षण महत्वाचे आहे. आदीवासी ठाकूर समाजातील मुले, मुली चांगले शिक्षण घेत आहेत. पालक वर्गाकडून त्यांना चांगला पाठींबा दिला जात आहे. शैक्षणिक क्षेत्रात समाजातील मुला मुलींची प्रगती बघून खऱ्या अर्थाने समाधान होत आहे.**
>
> **कृष्णा पिंगळा - गट शिक्षणाधिकारी, अलिबाग**

# माथेरानचे निसर्गसौंदर्य खुलले

**। माथेरान । वार्ताहर ।**

वर्षाऋतुमध्ये माथेरान सारख्या सुंदर पर्यटनस्थळाची भ्रमंती म्हणजे पर्यटकांना पर्वणीच असते. पावसाच्या सुरवातीला निसर्गाची वेगवेगळी रूपे येथे पहावयास मिळत असतात. मागील काही दिवसांपासून धुक्यात हरवलेले माथेरान सध्या पावसाने उसंत घेतल्यामुळे येथील निसर्गसौंदर्य आणखीनच खुलले आहे. येथील सर्वच पॉईंटवरून निसर्गाची वेगवेगळी रूपे पहावयला मिळत आहेत.

वर्षाऋतूमध्ये खऱ्या अर्थाने निसर्गाच्या चमत्काराची अनुभूती माथेरान या ठिकाणी पहावयला मिळते. सुरवातीच्या पावसात येथे धुक्यात हरवलेले माथेरान पर्यटकांना पहायला मिळत होते. मात्र, मागील आठवडाभर येथे पावसाने दडी मारल्यामुळे माथेरानचे निसर्गसौंदर्य आणखीन खुलले असून येथील प्रत्येक पॉईंटवरून निसर्गाची वेगवेगळी रूपे नयनरम्य देखावे येथे पहावयला मिळत आहेत. निसर्गाच्या



सानिध्यात भटकंती करताना वेळ कसा निघून जातो हे कळतही नाही.

येथील निसर्गाची नयनरम्य रूपे न्याहाळताना येथे स्वर्गच जणू धर्तीवर उतरला असल्याची जाणीव होत असल्याचे पर्यटकांकडून बोलले जात आहे. पावसाने आठवडाभर उघडीप घेतल्याने माथेरानकर सुद्धा हे नयनरम्य, निसर्गसौंदर्य देखावे आपल्या नजरेत आणि मोबाईलच्या कॅमेऱ्यात कैद करण्यासाठी सकाळच्या वेळेत भटकंती करताना दिसत आहेत.



● मुरूड परिसरातील गणेश आगमनाची तयार सुरू झाली असून एकदरा येथील कै रामचंद्र पाटील यांच्या कारखान्यातील हेमंत पाटील गणेशमुर्तींना आकार देताना. (छायाचित्रः सुधीर नाझरे)

## बचत गटाच्या स्टॉलचे उद्‌घाटन

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खोपोली नगरपरिषद मार्फत दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान अंतर्गत स्थापित बचत गट विविध वस्तू व खाद्य पदार्थ बनवत असतात. त्यांना हक्काची बाजारपेठ मिळवून देण्यासाठी भारतीय रेल्वे विभागामार्फत वन स्टेशन बन प्रोडक्ट या योजनेअंतर्गत खोपोली रेल्वे स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर बचत गटांची उत्पादने विक्री करण्यासाठी एक दुकान अल्पदरात केंद्र सरकार मार्फत सुरू करण्यात आले. या दुकानाचे उद्‌घाटन खोपोली नगर परिषदेचे प्रशासक तथा मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

# जेएनपीए परिसरातील खाडीचे प्रदुषण

**। उरण । वार्ताहर ।**

रसायनमिश्रित पाण्यामुळे जेएनपीए बंदर परिसरात अनेक ठिकाणी असलेल्या अनधिकृत सर्व्हिस सेंटरमध्ये मोठ्या प्रमाणात रसायनांचे टँकर धुण्यात येत आहेत. मात्र, पर्यावरणाला हानीकारक असलेल्या या कृत्याकडे संबंधित अधिकारी वर्ग जाणूनबुजून दुर्लक्ष करीत असल्याचे दिसत आहे. याबाबत पर्यावरण प्रेमी आणि मच्छीमारांनी टँकर धुतल्यानंतर बाहेर फेकल्या जाणाऱ्या रसायनमिश्रित पाण्यामुळे मासे मरत असल्याची तक्रार थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.

जेएनपीए कंटेनर फ्रेट स्टेशनजवळील सोनारी येथील अशाच एका सेवा केंद्रात दररोज



किमान १० टँकर स्वच्छ केले जातात, असे महाराष्ट्र स्मॉल स्केल ट्रॅडिशनल फिश वर्कर्स युनियनचे अध्यक्ष नंदकुमार पवार यांनी रायगड जिल्हाधिकारी यांकडे केलेल्या तक्रारीत म्हटले आहे.

जेएनपीए परिसरात अशी अनेक टँकर सेवा केंद्रे आहेत जिथून घातक रसायनांचे टँकर धुतले जात असून त्या माध्यमातून घातक रसायने थेट खाडीत जात असल्याने मोठ्या प्रमाणात मासे मारले जात असल्याचे ते म्हणाले. तसेच, रसायनांचे टँकर धुण्याचे प्रकार नियमित अंतराने घडत असून याचा परिसरातील जैवविविधतेवर परिणाम होतो, असे हितेश कोळी यांनी सांगितले. यामुळे यातील दोषींवर तत्काळ एफआयआर दाखल करून कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

## कृषी विभागाकडून मार्गदर्शन

**। उरण । वार्ताहर ।**

तालुक्यातील नागाव ग्रामपंचायत कार्यालय येथे मंगळव-ारी कृषि संजीवनी मोहीम अंतर्गत भात लागवड तंत्रज्ञान व विविध लागवड पद्धती, फळबाग लागवड, पीएम किसान योजना, भात पीक स्पर्धा, भात पीक विमा योजना, कृषी विषयक योजनांची माहिती कृषी सहायक आदिका पानसरे यांनी देऊन मार्गदर्शन केले. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना आत्मा अंतर्गत परसबागेतील भाजीपाला मिनिकीटचे के.एस. गायकवाड यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी आदिका पानसरे, शेतकरी भगिनी, ग्रामपंचायत महिला पदाधिकारी व शेतकरी उपस्थित होते.

# अनधिकृत बांधकामांना ऊत

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील माणगाव तर्फे वरेडी ग्रुप ग्रामपंचायत सदस्य मंडळाची मुदत संपली असून सध्या ग्रामपंचायतीवर प्रशासकीय राजवट आहे. परंतु, प्रशासकाच्या दुर्लक्षपणामुळे ग्रामपंचायत मधील सर्व गावांमध्ये अनधिकृत कामांचा सुळसुळाट सुरु आहे. तर, प्रशासक हे बघ्याची भूमिका घेत असल्याने अनधिकृत बांधकामे वाढत आहेत आणि त्यासाठी प्रशासकांच्या कामाबद्दल गटविकास अधिकारी यांना महेश भागाच्या यांच्याकडून तक्रार करण्यात आली आहे. या ग्रामपंचायत हद्दीमध्ये अनेक ठिकाणी गावठाण, गुरचरण जागेवरती अनधिकृत बांधकाम मोठ्या प्रमाणात चालू आहे.




त्याकडे ग्रामपंचायत प्रशासन यांची बघ्याची भूमिका दिसून येत आहे. पावसाळ्यामध्ये घरामध्ये पाणी येते म्हणून येथील लोक रस्त्यावर प्लॅस्टिक बांधत असतात. त्या प्लास्टिकचे रुपांतर पावसाळ्यानंतर पक्क्या स्वरूपात होत आहे.

परंतु, या सर्व गोष्टीकडे ग्रामपंचायत दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे येणाऱ्या भविष्यकाळामध्ये मोठ्या समस्या उद्भवणार आहेत.

## मासेमारी करताना खलाशी बेपत्ता

**। उरण । वार्ताहर ।**

पावसाळी मासेमारी बंदी असतानाही अवैध मासेमारी करणाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याचे आदेश विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी मत्स्यव्यवसाय आयुक्तांना दिले आहे. मात्र, हे आदेश फक्त कागदापुरतेच मर्यादित असल्याचे उघड होते. उरणमध्ये पावसाळी बंदी काळात दरवर्षी अवैध मासेमारी खुलेआम सुरू असते. काही दिवसांपूर्वी करंजा गावातील एका नामांकित सोसायटीच्या पदाधिकाऱ्याची बोट खोल समुद्रात मासेमारी करण्यासाठी गेली असता त्यातील एक २६ वर्षीय तरुण समुद्रात पडून बेपत्ता झाल्याची घटना घडली आहे.

# भात पीक विमा एक रुपयात

**। आगरदंडा । प्रतिनिधी ।**

नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक आधार मिळावा यासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजना कृषी विभागामार्फत राबविण्यात येत आहे. या योजनेत सहभागी शेतकऱ्यांना पेरणी न होणे तसेच पूर, दुष्काळ, पावसातील खंड यामुळे होणारे नुकसान, गारपीट, भूस्खलन, क्षेत्र जलमय होणे, वीज कोसळणे, ढगफूटी अशा स्थानिक नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान व काढणीनंतर शेतात सुकवणीसाठी ठेवलेल्या पिकांचे होणारे नुकसान या सर्व बाबींकरिता विमा संरक्षण लाभणार आहे.

कोकण विभागातील शेतकऱ्यांना केवळ एक रुपयात भात पिकाकरिता पिक विमा काढण्यासाठी अंतिम मुदत



दि.१५ जुलै आहे. खरीप हंगाम २०२४ पिक विम्यासाठी शेतकरी सहभागास सुरुवात झाली आहे. कोकण विभागामधील शेतकऱ्यांना केवळ एक रुपयात भात पिकाकरिता पिक विमा उतरविता येईल. या योजना कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक आहे. रायगड जिल्ह्यामध्ये चोलामंडलम एम एस जनरल इन्शुरन्स कंपनी मार्फत पिक विमा योजना राबविण्यात येणार आहे. भात पिकासाठी विमा संरक्षित रक्कम रुपये ५१,७६० प्रति हेक्टर आहे. ई-पीक पाहणी द्वारे नोंदविलेले पीक अंतिम गृहीत धरण्यात येणार असल्याने शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणी अंतर्गत पिकांची नोंदणी करावी लागणार आहे. विविध जोखमी अंतर्गत निश्चित होणारे नुकसान भरपाई ही केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांम धील अटी व शर्तींच्या अधीन राहून निश्चित केली जाईल.

## सुशोभीकरणाच्या कामावर प्रश्नचिन्ह

# जिजामाता तलावातील भगदाड दुरुस्त

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**नेरळ ग्रामपंचायतीच्या मालकीच्या राजमाता जिजामाता तलावाचे सुशोभीकरण केले जात आहे. या ठिकाणी तलावाच्या भिंतीला २० जून रोजी झालेल्या जोरदार पावसाने भगदाड पडले होते. दरम्यान, त्या भगदाड पडलेल्या भिंतीची दुरुस्ती जिल्हा परिषद बांधकाम विभागाने तात्काळ करून घेतली आहे. दरम्यान, राजमाता जिजामाता तलावाच्या भिंतीला पडलेले भगदाड बुजविण्यात आल्याने स्थानिकांनी जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे कौतुक केले आहे.**

कर्जततालुक्यातीलनेरळग्रामपंचायतमध्ये प्रादेशिक पर्यटन विभागातून ग्रामपंचायतीच्या मालकीच्या राजमाता जिजामाता तलावात सुशोभीकरण आणि मजबुतीकरण केले जात आहे. त्या माध्यमातून तलावातील पाण्याच्या तळाशी असलेल्या भिंतीला प्लास्टर तसेच तलावाच्या पाण्याच्या वरच्या भागात संरक्षण भिंत व अन्य कामे सुरु आहेत. २० जून रोजी नेरळ परिसरात साधारण दोन तास पाऊस पडला आणि त्या पावसात तलावातील भिंतीचे प्लास्टर कोसळले. सोबत तलावाच्या भिंतीला मोठे भगदाड पडले. या भगदाडामुळे नेरळ ग्रामपंचायतचे मालकीच्या राजमाता जिजामाता तलावाच्या सुशोभीकरण कामावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. साधारण दोन कोटी खर्चून राजमाता जिजामाता तलावाचे सुशोभीकरण केले जात आहेत.



त्या भगदाडाबद्दल माहिती मिळाल्यानंतर जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे उप अभियंता निलेश खिल्लारे यांनी पाहणी करून ठेकेदाराला निर्देश दिले जातील, असे आश्वासन नेरळ ग्रामस्थांना दिले होते. त्यानंतर उप अभियंता खिल्लारे यांनी पाहणी केल्यावर त्या भिंतीचे भगदाड बुजवून नव्याने बांधकाम करण्याचे निर्देश ठेकेदाराला दिले. ठेकेदाराने ते भगदाड बुजवून घेतले त्याचवेळी तलावाच्या वरच्या भागात देखील नव्याने सिमेंटच्या साहाय्याने पीसीसी करून घेतले आहे. जिल्हा परिषदेने नित्कृष्ट दर्जाच्या कामाबद्दल तात्काळ कारवाई करून नव्याने ते बांधकाम करून घेतल्याने नेरळकरांनी समाधान व्यक्त केले आहे.

# अमली पदार्थ विरोधी दिन



**। कोलाड । वार्ताहर ।**

कोलाड पोलीस स्टेशन यांच्यावतीने दि.२५ रोजी श्रमिक विद्यालय चील्हे, श्री रा.ग. पोटफोडे विद्यालय खांब या ठिकाणी अमली पदार्थांचे सेवनाचे दुष्परिणाम यावर कोलाड पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी नितीन मोहिते यांनी चांगले विवेचन करून कोणाही विद्यार्थ्याने अथवा त्यांच्या पालकांनी अमली पदार्थांचे सेवन करू नये, तसेच त्यांना सेवन करण्यास देऊ नये यासाठी प्रतिज्ञा देण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक जगताप माळी, मरवडे व इतर सर्व शिक्षक वर्ग तसेच जवळपास ३०० विद्यार्थी उपस्थित होते.

त्याचप्रमाणे आंबेवाडी नाका येथे मिनीडोर रिक्षा चालक संघटना रिक्षा चालक संघटना यांचे अध्यक्ष उपाध्यक्ष व इतर सदस्य यांना अमली पदार्थ विरोधी प्रचाराकरिता पत्रक यांचे वाटप करण्यात आले. यावेळी रिक्षा चालकांना देखील अमली पदार्थांचे सेवन करू नये याकरिता प्रतिज्ञा देण्यात आली.

# कुछ भी नही बदला है

नरेंद्र मोदींना हेच सांगायचे आहे. काहीच बदललेले नाही. भले आमच्या जागा ६३ ने कमी झाल्या असतील. भले रालोआला लोकसभेत जेमतेम २१ जागांचे बहुमत असेल. भले आम्हाला सत्तेत राहण्यासाठी दोन मुख्य पक्षांचा आधार घ्यावा लागला असेल. तरीही आम्ही आमचा माज चालूच ठेवणार. आम्ही २०१४ पासून जसे वागलो तसेच वागणार. विरोधकांना कस्पटासमान वागवणार. संसदेतील प्रथा-परंपरांना चिरडून टाकणार. ओम बिर्ला यांची लोकसभा सभापतीपदी निवड होताना जे काही नाटक घडले त्यातून मोदींना हाच संदेश द्यायचा आहे- हम नही सुधरेंगे. चार जून रोजी निकाल आले तेव्हा वेगवेगळ्या चर्चा होत्या. आता तेलुगु देसम आणि नीतीशकुमार यांचा जनता दल मोदींना आपल्या तालावर नाचवतील, अटी घालतील, लोकसभेच्या सभापतिपदाची मागणी करतील, मोक्याची मंत्रिपदे मागतील इत्यादी. यातील काहीही घडलेले नाही हे लक्षात घ्यायला हवे. मोदी यांनी मंत्रिमंडळातील भाजपचे मंत्री व त्यांची खाती कायम ठेवून या चर्चेला पहिला हादरा दिला. अनेकांना वाटत होते की किमान अमित शाह यांचे खाते बदलले जाईल. इडी, सीबीआयचा हैदोस थांबेल. ते झालेले नाही. उलट बुधवारी अरविंद केजरीवाल यांच्या जामिनासाठी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार असतानाच सीबीआयने त्यांना याच प्रकरणात पुन्हा अटक केली आहे. हा राज्यघटनेचा, साधनशुचितेचा व संकेतांचा सरळसरळ खून आहे. दिवसाढवळ्या असा खून करून मोदी आणि शाह हेच दाखवू पाहत आहेत की, सत्तेतली त्यांची गुंडगिरी चालूच राहणार आहे. मंगळवारी लोकसभा सभापतिपदाची चर्चा सुरू झाली तेव्हा भाजपने पुन्हा एकवार ओम बिर्ला यांचे नाव पुढे आणले. बिर्ला यांची २०१९ ते २४ ही पहिली कारकीर्द त्यांच्या पदाच्या प्रतिष्ठेला काळिमा फासणारी होती. विरोधकांना बोलू न देणे, राहुल गांधी बोलत असताना कॅमेरा काढून घेणे असे अनेक उपद्व्याप त्यांच्या काळात झाले होते.

## हे का करावे लागले?

याच बिर्ला यांनी विरोधकांच्या दीडशे खासदारांना निलंबित केले होते. त्यावेळी विरोधकांशी चर्चा करावी असे त्यांना वाटले नव्हते. महुआ मोईत्रा किंवा राहुल गांधी यांच्या निलंबनाबाबत तत्परता दाखवताना दानिश अली या मुस्लिम खासदारावर अश्लील टीका होत असतानाही हे बिर्ला गप्प होते. सभापती म्हणून त्यांचेच नाव पुढे आणणे हे मोदींचे खास खुनशी असे डावपेच होते. विरोधकांनी बहुमताचा आदर करून बिर्ला यांचे नाव एकमताने मान्य करण्याची तयारी दर्शवली. मात्र त्यासाठी उपसभापतीपद विरोधी पक्षांना मिळावे ही प्रथा पाळली जाईल अशी हमी त्यांना सरकारकडून हवी होती. असे करण्याची त्यांच्यावर वेळ का आली तेही समजून घ्यायला हवे. २०१४ मध्ये मोदींच्या पहिल्या कार्यकाळात विरोधी पक्षांऐवजी अण्णा द्रमुक आणि अकाली दल या मित्रपक्षाच्या नेत्यांना हे पद देण्यात आले. २०१९ पासून पुढची पाच वर्षे तर हे पद रिक्तच ठेवण्यात आले. हे करताना भाजपला लोकशाही, सभ्यता, संकेत इत्यादींची आठवण झाली नाही. आणि तरीही इंडिया आघाडीने उपसभापतिपदाची केलेली मागणी ही अटी व शर्ती घालणे आहे असा कांगावा भाजपने केला. बुधवारी अखेर विरोधकांनीच हे प्रकरण अधिक व वाढवता आवाजी मतदानाचा निर्णय मान्य करून टाकला. आता बिर्ला यांची निवड विरोधकांनी एकमताने होऊ दिली नाही असे कारण देऊन मोदी व त्यांचे कुटील साथीदार उपसभापतिपदही आपल्याच गटात ठेवतील यात शंका नाही. तसे करताना ते कदाचित एखाद्या दलित व अल्पसंख्य उमेदवाराची निवड करतील आणि त्याला विरोधकांनी पाठिंबा दिला नाही म्हणून गहजब करतील. मिडियाही त्यांच्या सुरात सूर मिसळेल. या पार्श्वभूमीवर, सरकार व त्याचे समर्थक यांना विरोधकांनी ताळ्यावर आणण्याची गरज आहे. चार जूननंतर गोष्टी बदललेल्या आहेत आणि आपल्याकडे अधिक ताकद आहे हे त्यांना पदोपदी दाखवून द्यावे लागणार आहे.

## दीर्घद्वेष चालूच

विरोधक हे किती सातत्याने व प्रभावीपणे करतात याबाबत त्यांची कसोटी लागणार आहे. राहुल गांधी यांची विरोधी पक्षनेतेपदी निवड होईल असे संकेत आहेत. भाजपवाल्यांनी २०२४ ची लढाई मोदी विरुध्द राहुल आहे असा प्रचार केला होता. राहुल यांना पप्पू ठरवून आपण ही लढाई सहज जिंकू असा भ्रम त्यामागे होता. प्रत्यक्षात त्यांना दणका बसला. आता तेच राहुल मोदींसमोर विरोधी नेते म्हणून बसू शकतील. मात्र हे करताना राहुल यांच्यावरची जबाबदारी अनेक पटीने वाढेल. पण त्या नंतरच्या गोष्टी झाल्या. तूर्तास उपसभापतीपद विरोधकांना देणे ते भाग पाडू शकतात का हे पाहावे लागेल. ओम बिर्लांची निवड आवाजी मतदानाने होऊन देऊन विरोधकांनी पहिली उतारी तर नीट केली आहे. ही निवड मतपत्रांद्वारे झाली असती व विरोधकांची संख्या २३४ पेक्षा कमी भरली असती तर त्यांच्यासाठी ती नामुष्की झाली असती. ती त्यांनी टाळली आहे. एक प्रकारे त्यांनी सरकारकडे सहकार्याचा हात पुढे केला आहे. अर्थात त्याला अत्यंत दीर्घद्वेष्टे मोदी सरकार योग्य तो प्रतिसाद देणे कठीणच आहे. बिर्ला यांनी आभाराच्या आपल्या भाषणात आणीबाणीची आठवण काढून विरोधकांना डिवचण्याचा प्रयत्न केला. तो पाहता मोदी आणि बिर्ला यापुढेही असेच वागत राहणार हे स्पष्ट झाले. राहुल गांधी, अखिलेश यादव, तृणमूल काँग्रेसचे सुजित बंडोपाध्याय इत्यादींनी बिर्ला यांचे अभिनंदन करतानाच, आता तरी गेल्या वेळसारखा पक्षपातीपणा करू नका असे सुनावले. तुम्ही केवळ भाजपचे नव्हे तर सर्व लोकसभेचे सभापती आहात व सर्वांना सारखा न्याय दिला पाहिजे अशी भाषणे पहिल्याच दिवशी लोकसभेत व्हावीत यावरून पुढील समरप्रसंगाची कल्पना येईल. गोष्टी अजिबात बदलणार नाहीत असे मोदी मस्तवालपणे सांगत आहेत. याला प्रत्येक क्षणी शह द्यावा लागेल याची खूणगाठ विरोधकांनी बाळगलेली बरी.

विचार

# कोट्यधीशांचे स्थलांतर, मोबाईल स्थित्यंतर

*लक्षवेधी आणि माहितीपुर्ण बातम्यांनी सरता आठवडा गाजवला. पैकी भारतातून ४३०० कोट्यधीशांचे स्थलांतर होत असल्याची बातमी भुवया उंचावणारी ठरली. या व्यतिरीक्त फेक कॉल ओळखण्यासाठी नवी सेवा चर्चेत आली. मोबाईलजगतातली आघाडीची विवो कंपनी 'टाटा' खरेदी करणार असल्याची वार्ता कान टवकारणारी ठरली. या पार्श्वभूमीवर टोमॅटो शंभरी गाठणार असल्याची माहिती कोड्यात पाडणारी ठरली.*



महेश देशपांडे

लक्षवेधी आणि माहितीपुर्ण बातम्यांनी सरता आठवडा गाजवला. त्यातील काही विशेष दखलपात्र आहेत. पैकी भारतातून ४३०० कोट्यधीशांचे स्थलांतर होत असल्याची बातमी भुवया उंचावणारी ठरली. या व्यतिरीक्त फेक कॉल ओळखण्यासाठी नवी सेवा चर्चेत आली. मोबाईलजगतातली आघाडीची विवो कंपनी 'टाटा' खरेदी करणार असल्याची वार्ता कान टवकारणारी ठरली. या पार्श्वभूमीवर टोमॅटो शंभरी गाठणार असल्याची माहिती कोड्यात पाडणारी ठरली.

'हेन्ली अँड पार्टनर्स' या आंतरराष्ट्रीय गुंतवणूक स्थलांतर सल्लागार फर्मच्या अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे की या वर्षी सुमारे ४३०० लक्षाधीश देश सोडून जाण्याची शक्यता आहे. ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. विशेष बाब म्हणजे देशात दर वर्षी अनेक व्यक्ती उदयास येतात; पण दर वर्षी देश सोडून जाणाऱ्यांची संख्या कमी नसते. देशात व्यवसाय करण्यासोबतच हे लोक दुसऱ्या देशाचे नागरित्व स्वीकारतात. या करोडपतींमार्फत पैसा बाहेर जाणे ही विशेष चिंतेची बाब नाही. कारण जेवढे करोडपती देश सोडून बाहेर पडत आहेत, त्यापेक्षा जास्त देशात निर्माण होत आहेत, असे या अहवालात म्हटले आहे. संयुक्त अरब अमिराती आणि अमेरिकेत जाणाऱ्यांची संख्या अधिक आहे. अहवालात असेही म्हटले आहे की भारत सोडून गेलेले बहुतेक करोडपती आपला व्यवसाय आणि दुसरे घर येथे ठेवतात. ते एक सकारात्मक चिन्ह आहे. काही करोडपती देश सोडून जात असले, तरी देशातील आर्थिक आणि व्यावसायिक वातावरण श्रीमंत लोकांसाठी आकर्षक आहे. अहवालात नमूद करण्यात आले आहे की परदेशात गेल्यानंतरही अनेक लक्षाधीश आपल्या मागे सोडलेल्या मालमत्ता आणि गुंतवणुकीतून देशाच्या अर्थव्यवस्थेला मदत करत आहेत.

अहवालानुसार, भारतात करोडपतींची संख्या सातत्याने कमी होत आहे. त्यांचे लक्ष संयुक्त अरब अमिरातीकडे आहे. २०२४ मध्ये जगभरातील सुमारे एक लाख २८ हजार कोट्यधीश नवीन देशात स्थायिक होण्याची अपेक्षा आहे. त्यापैकी बहुतेक लोकांना संयुक्त अरब अमिराती आणि अमेरिकेत जायचे आहे. एखाद्या देशातून श्रीमंत लोकांचे निर्गमन महत्त्वपूर्ण असते. भारत सोडून जाणाऱ्या करोडपतींनी निर्माण केलेल्या कंपन्यांचा फायदा भारतीयांनाही होतो. उदाहरणार्थ, मायक्रोसॉफ्ट, ॲपल आणि टेस्ला सारख्या कंपन्या करोडपतींनी सुरू केल्या. या कंपन्यांनी हजारो लोकांना चांगल्या पगाराच्या नोकऱ्या दिल्या. यावरून लक्षाधीशांनी सुरू केलेल्या व्यवसायांचा आर्थिक परिणाम किती मोठा असू शकतो हे स्पष्ट होते. देश सोडून जाणाऱ्या लक्षाधीशांची संख्या हा देशाच्या आर्थिक आरोग्याचा एक महत्त्वाचा सूचक मानला जातो. अहवालात म्हटले आहे की एखाद्या देशाने मोठ्या संख्येने करोडपती गमावले असतील तर ते त्या देशातील काही गंभीर समस्येमुळे होत आहे. समस्या उद्भवतात तेव्हा श्रीमंत लोक बहुतेकदा देश सोडतात. त्यामुळे त्यांचे स्थलांतर भविष्यासाठी नकारात्मक लक्षण ठरू शकते. दरम्यान, सरकारने फेक स्पॅम कॉल ओळखण्यासाठी नवी सेवा सुरू केली आहे. त्याची चाचणी देशातील दोन शहरांमध्ये सुरू झाली आहे. मुंबई आणि हरियाणामधील चंदीगडमध्ये ही सेवा सुरू झाली आहे. त्यामुळे या शहरांमध्ये कॉल करणाऱ्याचा नंबर आणि नाव मोबाईलवर सेव्ह नसले तरी दिसू शकत आहे. सरकारने येत्या १५ जुलैपर्यंत ही सेवा देशभरात सुरू करण्याचे आदेश टेलिकॉम कंपन्यांना दिले आहेत. यामुळे कोणता कॉल घ्यावा अन् कोणता घेऊ नये, याचा निर्णय मोबाईलधारकाला घेता येणार आहे. मोदी सरकारच्या शंभर दिवसांच्या अजेंड्यामधील हा एक विषय आहे. कॉलर नेम प्रेजेंटेशन (सीएनएपी) अशी ही सेवा आहे. चाचणीतून या सेवेचा निकाल कसा असणार, याचा अहवाल दूरसंचार विभागाला देण्यात येणार आहे. त्यानंतर ही सेवा सर्वांना देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. कॉल घेताना झळकणारे नाव सीमकार्ड घेताना भरलेल्या अर्जावरील नावानुसार असणार आहे. सरकारने ट्रूकॉलर सारखी सेवा देण्याची योजना आखली होती. रेग्युलेटरने रिलायन्स जिओ, व्होडाफोन-आयडिया आणि एअरटेल सारख्या कंपन्यांना वर्षभरापूर्वी ही सेवा देण्यास सांगितले होते. आता त्याला अंतिम स्वरुप मिळाले आहे. काही दिवसांपूर्वी केंद्र सरकार आणि दूरसंचार विभागाने दूरसंचार ऑपरेटरला बनावट आंतरराष्ट्रीय कॉल ब्लॉक करण्याचे निर्देश दिले होते. हे कॉल आल्यावर भारतीय क्रमांक झळकत असल्याचे जाणवले होते. दूरसंचार विभागाकडे अनेक दिवसांपासून यासंबंधी तक्रारी येत होत्या. या कॉल्सद्वारे सायबर गुन्हे आणि आर्थिक फसवणूक होत होती.

आता मोर्चा वळवू उद्योगजगताकडे. देशातील सर्वात विश्वासार्ह कंपनी असलेला टाटा समूह नवीन व्यवसायात उतरण्याच्या तयारीत आहे. सुईपासून विमाने बनवण्यापर्यंत मजल मारणारी ही कंपनी आता स्मार्टफोन उद्योगात उतरणार आहे. एक दशकापूर्वी टाटा समूह मोबाईल नेटवर्क आणि हॅंडसेट बनवत होती; परंतु आता स्मार्टफोन बनवणार आहे. त्यासाठी चीनमधील विवो ही दिग्गज मोबाइल कंपनी खरेदी करण्याची तयारी टाटाने चालवली आहे. करार पूर्ण झाला तर या कंपनीत टाटा कंपनीचे ५१ टक्के शेअर्स असणार आहेत. त्यामुळे विदेशातील कंपनीचे सर्व नियंत्रण देशातील टाटा समूहाकडे येणार आहे. भारत सरकारने चीनमधील कंपन्यांवर नियंत्रण आणण्याची तयारी सुरू केली आहे. त्यामुळे चीनमधील 'विवो' ही मोठी कंपनी आपल्या कंपनीतील समभाग विकण्याची तयारी करत आहे. त्यासाठी टाटा समूहासोबत त्यांची चर्चा सुरू आहे. विवो टाटा सोबत स्मार्टफोन बनवणार आणि विक्री करणार आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दोन्ही कंपन्यांमध्ये प्राथमिक बोलणी झाली आहेत. आता विवोच्या मूल्यांकनावर हे प्रकरण आले आहे. टाटाने विवोचे मूल्यांकन केले आहे; परंतु विवोला त्यापेक्षा अधिक मूल्यांकन हवे आहे. टाटा या करारासाठी उत्सुक आहे; परंतु अद्याप काहीच निश्चित झालेले नाही.

सध्या भगवती प्रॉडक्ट या भारतीय कंपनीकडे विवोचे मोबाइल फोन तयार (मॅन्युफॅक्चरिंग) करण्याचे काम आहे. त्यासाठी या कंपनीने नोएडामधील प्लांटमध्ये भरती सुरू केली आहे. विवोचे मॅन्युफॅक्चरिंग युनिट नोएडामधील 'टेक्जोटन आयटी पार्क'मधील 'वर्ल्ड ट्रेड सेंटर'मध्ये असणार आहे. त्या ठिकाणी ग्रेटर नोएडामधील १७० एकर जागेवर नवीन युनिट उभारले जात आहे. त्या युनिटमधून येत्या काही दिवसांमध्ये उत्पादन सुरू होणार आहे. यापलिकडे टाटाकडून यासंदर्भात काहीच माहिती दिली जात नाही; परंतु हा करार करण्यासाठी दोन्ही कंपन्यांकडून वेगाने पावले उचलली गेली आहेत, हे नक्की. अर्थात या कंपनीवर कर लपवल्याचा आणि मनी लाँड्रिंगचाही आरोप आहे.

आता कृषी क्षेत्रावर एक कटाक्ष. टोमॅटोच्या दराने देशात आगपाखड सुरू केली आहे. ही आग दक्षिण आणि दक्षिण-पूर्वमार्गे कधीही उत्तरेकडे येऊ शकते. विशेष म्हणजे देशातील १७ राज्यांमध्ये टोमॅटोचे दर ५० रुपयांच्या वर गेले आहेत. देशात अशी नऊ राज्ये आहेत, जिथे टोमॅटोचा दर साठ रुपये प्रति किलोपेक्षा जास्त आहे. चार राज्यांमध्ये टोमॅटोचा दर सत्तर रुपयांपेक्षा जास्त आहे. असे एकच राज्य आहे जिथे टोमॅटोचे भाव शंभर रुपयांच्या पुढे गेले आहेत. तज्ज्ञांच्या मते, उष्णतेची लाट आणि टोमॅटोचे घटलेले उत्पादन यामुळे येत्या काही दिवसांमध्ये टोमॅटोच्या किमती शंभर रुपये प्रति किलो दराच्या पुढे जाण्याची शक्यता आहे. अंदमान निकोबारमध्ये टोमॅटोचे भाव शंभर रुपयांच्या पुढे गेले आहेत. ग्राहक व्यवहार मंत्रालयाच्या वेबसाइटवरून मिळालेल्या माहितीनुसार, २० जून रोजी येथे टोमॅटोचा भाव १००.३३ रुपये प्रति किलो होता. त्यानंतर नंबर लागतो तो केरळचा. तिथे टोमॅटोचा भाव ८२ रुपये किलो होता. मिझोराम आणि तामिळनाडूमध्ये टोमॅटोचा भाव ७० रुपये किलोच्या पुढे गेला आहे. तेलंगणा, गोवा, नागालॅंड, अरुणाचल प्रदेश आणि महाराष्ट्रात टोमॅटो ६० रुपयांपेक्षा जास्त प्रति किलो दराने विकला जात आहे. आंध्र प्रदेश, कर्नाटक, सिक्कीम, ओडिशा, दादरा आणि नगर हवेली, मेघालय, त्रिपुरा आणि पश्चिम बंगालमध्ये टोमॅटोचा भाव ५० रुपये किलोच्या वर पोहोचला आहे. ग्राहक व्यवहार मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार टोमॅटोच्या सरासरी दरात चांगली वाढ झाली आहे. दक्षिण भारतात टोमॅटोची दरवाढ अधिक दिसून येत आहे.

आजकाल

# १५१ वर्षाचे मुंबई बंदर

मारूती विश्वासराव

भारतातील इंग्रज काळातील जुन्या बंदरांपैकी एक असलेले मुंबई हे नैसर्गिक बंदर आहे. या बंदराचा थोडक्यात इतिहास असा की, भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील सात बेटांचा समूह असलेले मुंबई बेट आहे. १६५२ पासून ईस्ट इंडिया कंपनीच्या सुरत येथील प्रतिनिधींचे या बेटावर लक्ष होते. पण हे बेट भाडे करारावर देण्याच्या त्यांच्या विनंतीला पोर्तुगीजांनी दाद दिली नाही. त्यानंतर नऊ वर्षांनी इंग्लंडचा राजा दुसरा चार्ल्स आणि पोर्तुगालची राजकन्या कॅथरीन यांच्या विवाहात मुंबई बेट इंग्लंडच्या राजाकडे सुपूर्द करण्यात आले. राजाने हे बेट ईस्ट इंडिया कंपनीला भाडेतत्त्वावर दिले. वर्षाला १० पौंड किमतीचे सोने द्यावे, असे नाममात्र भाडे आकारले. अशा पद्धतीने १६६८ साली मुंबई बंदर आणि सात बेटे ( द्वीपसमूह ) ईस्ट इंडिया कंपनीकडे सोपविण्यात आल्यानंतर व्यापाराची भरभराट व्हावी यासाठी काही पावले उचलण्यात आली. कस्टम हाऊस,गोदामे, सुक्या गोद्या, अशी बांधकामे झाली. मुंबई बंदर हे जगभरातून येणाऱ्या वस्तूंच्या व्यापाराचा केंद्रबिंदू होताच, १७३० साली मुंबईमध्ये जहाज बांधणीचा व्यवसाय सुरू झाला आणि एका नवीन पर्वाची सुरुवात झाली.

ईस्ट इंडिया कंपनीचा अंमल १८५८ साली संपल्यानंतर मुंबई थेट ब्रिटिश घराण्याच्या अधिपत्याखाली आली. २६ जून १८७३ साली सध्या अस्तित्वात असलेले स्वायत्त बॉम्बे पोर्ट ट्रस्ट हे जे. ए. बॅलार्ड यांच्या अध्यक्षतेत कार्यान्वित झाले. त्यानंतर १८७५ साली पहिली गोदी ससून डॉकच्या रूपाने अस्तित्वात आली. १८८० साली प्रिन्सेस गोदी, १८८८ साली व्हीक्टोरिया गोदी व त्यानंतर १९१४ साली अलेक्झांडरा गोदी(सध्याची इंदिरा गोदी) बांधण्यात आली. मुंबई बंदराच्या उभारणीमुळे आणि त्यावर वाढणाऱ्या शहराने मोठे रूप धारण केले. अशा प्रकारे मुंबई बंदर हे जागतिक व्यापाराचे केंद्र बनले. कापड उद्योग वाढला, गिरण्यांची संख्या वाढली.

मुंबई बंदराच्या भरभराटीमुळे कामगारांची संख्या वाढत गेली व कामगार चळवळीची बीजे रोवली गेली. कामगार चळवळीचे जनक नारायण मेघाजी लोखंडे यांनी १८८९ मध्ये पहिली मिल अँड असोसिएशन ही कामगार संघटना स्थापन केली. तर मुंबई बंदरातील वर्कशॉपमधील कसबी कामगार कै. सदानंद गडकर व मोबाईल क्रेन खात्यातील कामगारांनी ३ मे १९२० रोजी बीपीटी एम्प्लॉईज युनियन (सध्याची मुंबई पोर्ट ट्रस्ट डॉक अँड जनरल एम्प्लॉईज युनियन) या पहिल्या कामगार संघटनेची स्थापना केली. मुंबई बंदरातील व देशभरातील गोदी कामगारांचे नेतृत्व डॉ. शान्ति पटेल व कॉ. एस. आर. कुलकर्णी अशा बलाढ्य व दूरदृष्टीच्या नेत्यांनी प्रदीर्घकाळ केले. सध्या ज्येष्ठ कामगार नेते ॲड.एस. के. शेट्ये देशातील गोदी कामगारांचे यशस्वीपणे नेतृत्व करीत आहेत. गोदी कामगारांना चांगली पगार वाढ, पेन्शन, वैद्यकीय सुविधा, कामाच्या सेवाशर्ती, निवासस्थान अशा अनेक सुविधा या नेत्यांनी मिळवून दिल्या. शंभर वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने कामगार व पोर्टच्या निधीतून शताब्दी स्मारक फंड निर्माण करून त्यातून कामगारांना शैक्षणिक कर्ज, अडचणीच्या वेळी आर्थिक मदत, चस्मा अशा अनेक कल्याणकारी योजना सुरू आहेत.

मुंबई बंदरात पूर्वी ४२ हजार कामगार होते आज ही संख्या ३१४७ कामगारांवर आली आहे. पेन्शनर्सची संख्या ३६००० आहे. नवीन भरती नाही. कंत्राटी कामगारांची संख्या वाढते आहे. अशा परिस्थितीत कमीत कमी कामगारांमध्ये २०२२-२३ या आर्थिक वर्षात दीडशे वर्षातील उच्चांकी ६३.६१ मिलियन टन्स मालाची हाताळणी मुंबई बंदराने केली आहे. यामध्ये कामगारांचा मोठा सहभाग आहे. म्हणून बंदराचे चेअरमन राजीव जलोटा यांनी कामगारांचे अभिनंदन केले आहे. मुंबई बंदरातील दीडशे वर्षांच्या इतिहासात तीन टप्प्यांचा विचार करता १८७३ ते १९४७ या ७४ वर्षांच्या काळात मुंबई बंदर विस्तारत गेले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९४७ ते १९९१ हा ४४ वर्षांचा काळ मुंबई बंदराच्या व कामगारांच्या दृष्टीने सुवर्णकाळ मानला जातो. त्या काळात कामगारांच्या सर्वांगीण विकासाची बिजे रोवली गेली.पुढील ३२ वर्षांचा काळ म्हणजे १९९१ ते २०२३ हा अनेक संकटांचा सामना करावा लागणारा काळ ठरला. कारण जागतिक आर्थिक महासत्तांच्या दबावापुढे भारताला नवीन आर्थिक धोरण स्वीकारावे लागले. याचा सर्वच क्षेत्रात परिणाम दिसून आला त्याला पोर्ट उद्योगही अपवाद नव्हता. मुंबई बंदरामुळे मुंबई शहराचा विकास झाला हे खरे आहे, मात्र काळानुरूप मुंबई शहराच्या बेसुमार वाढीमुळे मालवाहतुकीस अडथळे निर्माण होऊ लागले.१९८९ साली मुंबई पोर्ट कडून ५०० कोटी रुपये घेऊन १२०० कोटी रुपयांचा खर्च करून जवळच जवाहरलाल नेहरू पोर्ट उदयास आले. त्यामुळे या बंदराचा फटका मुंबई बंदराला बसला. कंटेनर वाहतूक जवाहरलाल नेहरू पोर्टकडे गेली. आपल्याकडील ब्रेक बल्क मालाची हाताळणी हळूहळू कमी होऊ लागली. गेल्या दशकात आपण आपल्या मुख्य मालवाहतूक हाताळण्याच्या कामापासून प्रवासी वाहतुकीकडे लक्ष केंद्रित करून आंतरराष्ट्रीय क्रुझ टर्मिनल उभारण्याचा निर्णय घेतला. डोमेस्टिक क्रुझ टर्मिनल व रो - पॅक्स टर्मिनल उभारले. जवाहर द्वीप येथे पाचवी तेलाची जेटी उभारली. पिरपाव येथे तिसऱ्या केमिकल जेटीचे काम चालू आहे.

दरम्यानच्या काळात केंद्र सरकारने बंदरांना अधिक स्वायत्तता मिळावी म्हणून मेजर पोर्ट अथॉरिटी ॲक्ट २०२१ हा कायदा अमलात आणला. बंदरांना आपापले दर ठरविण्याचे अधिकार मिळाले. तरीही अनेक कामांसाठी केंद्र सरकारच्या परवानगीची आवश्यकता भासते. मुंबई बंदराकडे १८०० एकर जमीन आहे. त्याबाबत बोर्डाने नवीन दर आकारणी मंजूर केली आहे. त्यामुळे भविष्यात जमिनीचा योग्य वापर होऊन मुंबई बंदराला त्यातून चांगले उत्पन्न मिळू शकेल. कामगारांना घरांसाठी माफक दरात जागा द्यावी ही अनेक वर्षांची मागणी पूर्ण करून उत्पन्न मिळू शकेल.अशा प्रकारे मुंबई बंदर लॅंड लॉर्ड पोर्ट मॉडेलच्या माध्यमातून आर्थिक संकटातून हळूहळू बाहेर पडत आहे. ही मोठी आशादायी गोष्ट आहे. पेन्शन फंडातील तूट ४९४३ कोटींवरून २१०८ कोटींपर्यंत कमी करण्यात मुंबई बंदराला यश आले आहे. अशा प्रकारे मुंबई बंदराची आर्थिक स्थिती सुधारण्याचा प्रयत्न सध्याचे अध्यक्ष श्री. राजीव जलोटा व उपाध्यक्ष श्री. आदेश तितरमारे यांच्या नेतृत्वात सर्व विभाग प्रमुखांच्या माध्यमातून सुरू आहे. ज्याप्रमाणे मुंबई बंदराचे संस्थापक अध्यक्ष जे. ए.बॅलार्ड यांचे नाव इतिहासात कोरले आहे त्याचप्रमाणे दीडशे वर्ष साजरी करत असताना सध्याचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचेही नाव मुंबई बंदराच्या इतिहासात लिहिले जाईल. या ऐतिहासिक घटनेचे महत्त्व लक्षात घेऊन कामगारांना १५१ वर्षांच्या निमित्ताने आठवणीत राहील अशी भेटवस्तू देऊन सन्मानित करावे ही माफक अपेक्षा! डॉ. शान्ति पटेल व कॉम्रेड एस आर कुलकर्णी यांच्या विश्वस्त पदाच्या प्रदीर्घ काळानंतर सुधाकर अपराज व केरसी पारेख यांनी विश्वस्त पदाची धुरा यशस्वीपणे सांभाळली. केंद्र सरकारच्या नवीन कायद्यानुसार सेवेतील कामगार हा कामगार प्रतिनिधी असावा या नियमाच्या आधारे युनियनच्या शिफारसीनुसार कामगार प्रतिनिधी म्हणून दत्ता खेसे व श्रीमती कल्पना देसाई यांची बोर्ड सदस्य म्हणून नेमणूक झाली. त्यांनी देखील गोदी कामगारांची बाजू बोर्डामध्ये समर्थपणे मांडली व कामगारांना न्याय मिळवून दिला.

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२७ जून**

**१८६४:-** निबंधकार, पत्रकार, साहित्यिक-समीक्षक, फर्डे वक्ते शिवराम महादेव परांजपे यांचा जन्म. 'काळ' साप्ताहिकाचे संस्थापक, वा 'काळ-कर्ते' ही त्यांची ओळख. 'एका खडी फोडणाऱ्याची गोष्ट', 'विंध्याचल' या कादंबऱ्या. 'पहिला पांडव', 'मानाजीराव' आदी ९ नाटके. 'अहिल्याजारकाव्य''तर्कसंग्रहदीपिका मराठ्यांच्या लढायांचा इतिहास' आदी सुमारे २० संकीर्ण पुस्तके आणि 'काळ' मधील निवडक निबंध ही त्यांची ग्रंथसंपदा किर्लोस्करांच्या 'सं. सौभद्र' नाटकाचे त्यांनी संस्कृत भाषांतर केले होते. **१८८५:-** 'दत्त' या टोपणनावाने काव्यलेखन करणारे दत्तात्रेय कोंडो धाटे यांचा जन्म. त्यांच्या कविता त्यांचे पुत्र वि. द. घाटे यांनी प्रसिध्द केला. कवी दत्त हे केशवसुतांनी प्रवर्तित केलेल्या आधुनिक मराठी कवितेचा एक प्रवक्ते होते. तत्कालिन नियतकालिकेतून त्यांच्या कविता प्रसिध्द. दत्तांनी प्रेम, निसर्ग, राष्ट्र आदी विषयांवर कविता केल्या. 'विश्वमित्रिच्या काठी' ही त्यांची निसर्ग कविता मराठीतील पहिलीच सौंदर्यलक्ष्मी हुरहुर व्यक्त करणारी कविता म्हणून उल्लेखनिय आहे. याशिवाय दत्तांनी अन्य साहित्यिक क्षेत्रातही कर्तृत्व गाजवले. त्यांचा अर्वाचीन मराठी कवितांचा एक प्रातिनिधिक संग्रह मात्र त्यांच्या अपघाती निधनाने पूर्ण झाला नाही. त्यांनी मेघदूताला नाट्यरुप दिले होते असाही एक प्रवाद आहे. **१९४०:-** 'आयुर्वेद' या विषयावर देशपरदेशातील नियतकालिकांतून विपूल प्रमाणात लेखन करणारे लेखक प्राचार्य डॉ. सुभाष भालचंद्र रानडे यांचा जन्म. ह्यांनी 'अष्टांग संग्रह', 'आपली तब्येत सांभाळा', 'आयुर्वेद इतिहास आणि परिचय', 'कार्यचिकित्सा भाग १, २', 'घरगुती औषध आणि उपचार', 'पाठदुखी', 'कंबरदुखी', 'हृदयविकार शल्यतंत्र भाग १,२' मिळून तीसहून अधिक प्रकाशित झालेल्या ग्रंथाचे लेखन त्यांनी केले. **१९५१:-** लेखक, पत्रकार संजय शंकर चिटणीस यांचा जन्म. विविध मराठी वृत्तपत्रातून लेखन करणाऱ्या चिटणीसांनी 'राजकीय खटल्यातील थोर व्यक्ती' हे पुस्तक लिहिले आहे. **१९६८:-** शिक्षणतज्ञ, बालवाङ्मयकार महादेव काशीनाथ कारखानीस यांचे निधन. कारखानीस यांनी शिक्षकांसाठी, अध्यापन सुकर व्हावे यासाठी 'शिक्षक आणि शिक्षण', 'अंकगणित कसे शिकवावे', 'व्याकरण कसे शिकवावे' यांसह ज्ञानरंजनपर २० पुस्तके लिहिली होती. **१९८९:-** संस्कृतमधील ज्ञान अर्वाचीन मराठीत आणण्यासाठी 'प्राचीन काव्यशास्त्र', 'कालिदासाची नाटके', 'प्राचीन भारतीय राज नीती', 'कौटिलीय अर्थशास्त्र' आदी पुस्तके लिहिणारे संस्कृतचे गाढे अभ्यासक रमाकांत पंढरीनाथ कंगले यांचे निधन. १९२२ : चरित्रकार, शिक्षणतज्ज्ञ म्हणून नावाजलेले द.न. गोखले यांचा जन्म २० सप्टेंबर १९२२ रोजी झाला. बी.ए.बी.टी. आणि पीएचडीची पदवी संपादन करणाऱ्या गोखल्यांनी काही काळ शिक्षक, मुख्याध्यापक आणि उच्च महाविद्यालयात प्राध्यापकी केली. गोखल्यांनी अनेक संपादित तसेच स्वतंत्र पुस्तके लिहिली आहेत. त्यांच्या संपादित साहित्यात य. गो. जोशी आणि साने गुरुजींच्या निवडक कथांचे संपादन, रा. श्री. जोग गौरवग्रंथ (सहसंपादन) माधव जुलियन आदींचा समावेश होतो. ज्ञानकोशकार केतकरांचे गोखले यांनी लिहिलेले चरित्र केतकरांच्या व्यक्तिमत्वाचे व कर्तृत्वाचे पैलू स्पष्ट करणारे आहे. त्यांच्या डॉ. केतकर या ग्रंथाला साहित्य अकादमी पारितोषिक प्राप्त झाले. 'डॉ. पटवर्धन उर्फ माधव 'ज्युलियन' हा गोखल्यांनी लिहिलेला आणखी एक चरित्रग्रंथ. यातून माधव ज्युलियनच्या व्यक्तिमत्वातील गुंतागुंत गोखल्यांनी वस्तुनिष्ठपणे मांडली आहे. याशिवाय 'अमेरिकन माध्यमिक शाळा', 'डॉ. केतकरांच्या कादंबऱ्या' हे त्यांचे आणखी दोन महत्त्वपूर्ण ग्रंथ. सावरकरांच्या हिंदुत्वविषयक विचारांचे संकलन करणारे 'हिंदुत्वदर्शन' हा ग्रंथ गोखल्यांच्या सर्व साहित्यात महत्त्वपूर्ण ठरतो. याशिवाय क्रांतिवीर बाबाराव सावरकर, स्वातंत्र्यवीर सावरकर एक रहस्य, गांधाजी : मानव आणि महामानव ही त्यांची पुस्तकेही महत्त्वपूर्ण आहेत. एका चरित्राचे चरित्र हे माधव जुलियन यांच्यावरील चरित्राच्या निर्मितीसंबंधीचे पुस्तक तसेच मचरित्रचिंतन हे सुनीता देशपांडे (आहे मनोहर तरी) आदींच्या चरित्र, आत्मचरित्रांचे समालोचन करणारे आगळेवेगळे असे वैशिष्ट्यपूर्ण पुस्तक आहे. मराठी साहित्यातील चरित्र विभाग आपल्या लेखनाने समृद्ध करणाऱ्या या चरित्रलेखकाचे २७ जून २००० रोजी निधन झाले. **२०००:-** लेखक डॉ. द. न. गोखले यांचे निधन. ह्यांचा 'शुध्द-लेखन विवेक' हा मराठी ग्रंथ प्रकाशित झाला आहे.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

# अलिबाग को-ऑप. अर्बन बँक लि.अलिबाग

# दिनांक ३१ मार्च २०२४ अखेरील ताळेबंद व नफा तोटा पत्रक

ALIBAG CO-OPERATIVE URBAN BANK LTD., ALIBAG
ALIBAG- RAIGAD.

FORM 'A'
BALANCE SHEET
as at 31st March 2024

| Sr.No. | | Particulars | Schedules | As at 31st March 2024 | As at 31st March 2023 |
|---|---|---|---|---|---|
| A | | Capital And Liabilities | | | |
| | i | Share Capital | 1 | 69,301,300.00 | 68,682,550.00 |
| | ii | Reserves & Surplus | 2 | 95,420,079.90 | 88,409,172.32 |
| | iii | Deposits | 3 | 1,593,023,082.10 | 1,746,313,554.80 |
| | iv | Borrowings | 4 | - | - |
| | v | Other Liabilities and Provisions | 5 | 184,418,020.16 | 156,556,183.04 |
| | vi | Bills for Collection - Contra | 14 | - | - |
| | vii | Profit & Loss Account | 6 | 7,287,590.22 | 6,339,207.58 |
| | | Total (A) | | 1,949,450,072.38 | 2,066,300,667.74 |
| B | | Assets | | | |
| | i | Cash in Hand | 7 | 68,320,879.09 | 92,910,467.65 |
| | ii | Balances with Banks & Money at Call & Short Notice | 8 | 72,073,175.12 | 88,662,042.45 |
| | iii | Investments | 9 | 619,151,531.00 | 736,597,461.00 |
| | iv | Loans and Advances | 10 | 1,078,024,665.12 | 1,042,995,839.52 |
| | v | Interest Receivable | 11 | 76,296,026.60 | 70,084,239.38 |
| | vi | Fixed Assets | 12 | 18,040,257.82 | 20,993,149.47 |
| | vii | Other Assets | 13 | 17,543,537.63 | 14,057,468.27 |
| | viii | Bills for Collection - Contra | 14 | - | - |
| | ix | Profit & Loss Account | - | - | - |
| | x | Accompaning notes form an integral part of the financial statements | 23 | - | - |
| | | Total (B) | | 1,949,450,072.38 | 2,066,300,667.74 |

As per our Report of Even Date — On Behalf of Board of Directors

For M/s. Vaishampayan & Padhye
Chartered Accountants
Firm Registration No. 119380W

sd/- Subhash V. Mhatre (Vice Chairman) — sd/- Supriya J. Patil (Chairperson)

sd/-
CA Jayvant B. Vaishampayan
(Senior Partner)
Membership No. 037420
Empanelment No. 14868

sd/- B.C.More (Chief Executive Officer) — sd/- Adv. Sachin Joshi (Director)

Place: Alibag
Date: 25-06-2024
UDIN : 24037420BKAEVN8818

FORM 'B'
PROFIT AND LOSS ACCOUNT
for the Year Ended 31st March 2024

| Sr.No. | | Particulars | Schedules | As at 31st March 2024 | As at 31st March 2023 |
|---|---|---|---|---|---|
| A | | INCOME | | | |
| | i | Interest Earned | 15 | 183,862,295.30 | 192,020,766.50 |
| | ii | Other Income | 16 | 6,957,899.25 | 6,796,559.60 |
| | iii | Other Income | 17 | 5,820,069.00 | - |
| | | Total (A) | | 196,640,263.55 | 198,817,326.10 |
| B | | EXPENDITURE | | | |
| | i | Interest Expended | 18 | 97,945,989.36 | 114,688,695.50 |
| | ii | Operating Expenses | 19 | 68,127,801.97 | 67,199,934.02 |
| | iii | Provisions And Contingencies | 20 | 23,278,882.00 | 10,589,489.00 |
| | | Total (B) | | 189,352,673.33 | 192,478,118.52 |
| C | | Net Profit / Loss for the year (A - B) | 21 | 7,287,590.22 | 6,339,207.58 |
| | | Accompaning notes form an integral part of the financial statements | 22 | - | - |
| | | Total (B + C) | | 196,640,263.55 | 198,817,326.10 |
| | | | | - | - |

As per our Report of Even Date — On Behalf of Board of Directors

For M/s. Vaishampayan & Padhye
Chartered Accountants
Firm Registration No. 119380W

sd/- Subhash V. Mhatre (Vice Chairman) — sd/- Supriya J. Patil (Chairperson)

sd/-
CA Jayvant B. Vaishampayan
(Senior Partner)
Membership No. 037420
Empanelment No. 14868

sd/- B.C.More (Chief Executive Officer) — sd/- Adv. Sachin Joshi (Director)

Place: Alibag
Date: 25-06-2024
UDIN : 24037420BKAEVN8818

## Cash Flow Statement For the Year Ended 31st March 2024

| Particulars | | |
|---|---|---|
| Increase in Net Profit as per PL accounts | | 856,882.00 |
| **SUB TOTAL** | | **856,882.00** |
| **Cash from operative Activities** | | |
| Decrease/Increase in Deposits | -153,290,472.70 | |
| Decrease/Increase in Loans & Advances | -35,028,825.60 | |
| Decrease/Increase Branch Adjustment | -110,545.00 | |
| Decrease/Increase in other liabilities | 24,692,812.62 | |
| Decrease/Increase Other Assets | 838,959.64 | |
| Decrease/IncreaseNon Banking | - | |
| **SUB TOTAL A** | | **-162,898,071.04** |
| **Cash from Investing Activities** | | |
| Decrease/Increase in Investment | 117,445,930.00 | |
| Decrease/Increase Fixed Assets | 2,952,891.65 | |
| Decrease/Increase in Interest Payable | -552,509.00 | |
| Decrease in Interest Receivable | -6,363,576.22 | |
| Increase/Decrease in Provisions | - | |
| Increase in OD Interest | - | |
| **SUB TOTAL B** | | **113,482,736.43** |
| **Cash from Financing Activities** | | |
| Increase in Reserve | 6,761,246.58 | |
| Increase in Share Capital | 618,750.00 | |
| Decrease/Increase in Borrowing | - | |
| **SUB TOTAL C** | | **7,379,996.58** |
| **Net Increase in Cash & equivalents** | | **-41,178,456.03** |
| Opening Cash & Cash Equivalents | | 181,572,510.00 |
| Closing Cash & Cash Equivalents | | 140,394,054.00 |
| **Net Increase in cash & cash equivalents** | | **140,394,053.97** |

**For Alibag Co-operative Urban Bank Ltd.**

sd/-
**B.C. More**
**CEO**

**For M/s. Vaishampayan & Padhye**
**Chartered Accountants**
**Firm Regn. No. 119380W**

sd/-
**CA Jayvant Vaishampayan**
**(Senior Partner)**
**M. No. 037420**
**Place : Alibag**
**Date : 25-06-2024**
**UDIN : 24037420BKAEVN8818**

ALIBAG CO-OPERATIVE URBAN BANK LTD., ALIBAG
Schedules forming part of Financial Statements as at 31st March, 2024

SCHEDULE 1 - SHARE CAPITAL

| Particulars | 31st March 2024 | | 31st March 2023 | |
|---|---|---|---|---|
| A ) Authorised Share Capital 100000 shares of ` 1,000/- each | | | | |
| B ) Paid up Share Capital | | | | |
| (33826 Shares of Rs. 50/- each & 67610 Shares of Rs. 1000/- each) | | | | |
| 1) Individuals - Number of Members - 18689 | 64,955,000.00 | | | |
| 2) Institutions - Number of Members - 128 | 4,346,300.00 | 69,301,300.00 | | 68,682,550.00 |
| TOTAL | | 69,301,300.00 | | 68,682,550.00 |

SCHEDULE 2 - RESERVES & SURPLUS

| Particulars | 31st March 2024 | | 31st March 2023 | |
|---|---|---|---|---|
| A ) Reserve Fund | | | | |
| 1) Opening Balance | 41,119,100.63 | | 40,795,927.63 | |
| 2) Admission Fee | 13,800.00 | | 14,100.00 | |
| 3) Nominal Members Fee | 157,900.00 | | 164,300.00 | |
| 4) From Profit 2022-23 | 1,343,690.00 | | | |
| 5) Dividend 2017-2018 | - | 42,634,490.63 | 144,773.00 | 41,119,100.63 |
| B ) Other Reserves and Funds | | | | |
| 1) Building Fund | 22,625,858.84 | | 22,625,858.84 | |
| Add: From Profits of Previous Years | 500,000.00 | 23,125,858.84 | - | 22,625,858.84 |
| 2) Building Revaluation Fund | 9,986,429.63 | | 10,242,491.63 | |
| Less: Transfer to General Reserve A/c | 249,661.00 | 9,736,768.63 | 256,062.00 | 9,986,429.63 |
| 3) Investment Fluctuation Reserve | 7,400,000.00 | | 7,400,000.00 | |
| Add: From Profits of Previous Years | - | 7,400,000.00 | - | 7,400,000.00 |
| 4) Staff Welfare Fund | 297,232.50 | | | 297,232.50 |
| Add: From Profits of Previous Years | 500,000.00 | 797,232.50 | | |
| 5) Provision for Standard Assets | 7,945,000.00 | | 7,445,000.00 | |
| Add: Provision | 500,000.00 | 8,445,000.00 | 500,000.00 | 7,945,000.00 |
| 6) General Reserve Account | | 249,661.00 | | |
| C) Previous Balance From Profit *(Refer note 5.1)* | | 3,031,068.30 | | (964,449.28) |
| TOTAL | | 95,420,079.90 | | 88,409,172.32 |

SCHEDULE 3 - DEPOSITS

| Particulars | 31st March 2024 | | 31st March 2023 | |
|---|---|---|---|---|
| A ) Demand Deposits | | | | |
| 1) Pigmy | 53,120,452.20 | | 49,566,511.20 | |
| 2) Mahila Pradhan Pigmy | - | | - | |
| 3) Current | 42,211,398.65 | 95,331,850.85 | 42,666,388.25 | 92,232,899.45 |
| B ) Savings Bank Deposits | | | | |
| 1) Savings | | 303,783,178.45 | | 288,214,317.29 |
| C ) Term Deposits | | | | |
| 1) Fixed Deposits | 192,047,843.55 | | 248,936,614.55 | |
| 2) Dam Duppat Plan | 41,230,251.40 | | 57,698,434.40 | |
| 3) Re Investment Plan | 799,727,471.85 | | 893,043,810.85 | |
| 4) Recurring Deposit | 21,098,648.00 | | 19,067,589.26 | |
| 5) Short Term Deposit | - | | - | |
| 6) Monthly Income Plan | 116,403,624.00 | | 134,869,932.00 | |
| 7) Fixed Deposit ( Customer QTR ) | 91,800.00 | | 91,800.00 | |
| 8) Term Deposit Matured | 10,119,782.00 | | 6,405,579.00 | |
| 9) Short Term Deposit with Interest | 3,836,373.00 | | 5,609,499.00 | |
| 10) Hundred Day FDR | 9,352,259.00 | 1,193,908,052.80 | 143,079.00 | 1,365,866,338.06 |
| TOTAL | | 1,593,023,082.10 | | 1,746,313,554.80 |

SCHEDULE 4 - BORROWINGS

| Particulars | 31st March 2024 | | 31st March 2023 | |
|---|---|---|---|---|
| NIL | | - | | - |
| TOTAL | | - | | - |

SCHEDULE 5 - OTHER LIABILITIES AND PROVISSIONS

| Particulars | 31st March 2024 | | 31st March 2023 | |
|---|---|---|---|---|
| A) Other Liabilities | | | | |
| 1) Sundry Payable | 7,785,810.09 | | 1,906,365.95 | |
19. In accordance with the "The Depositor Education and Awareness Fund Scheme, 2014" formulated by RBI, during F.Y. 2023-2024, the Bank has identified and

transferred Rs. 0.10 Crore to the Depositor Education and Awareness Funds in F.Y. 2023-2024. The details below:

**(Rs. in Crores)**

| Particulars | F. Y. 2023-24 | F. Y. 2022-23 |
|---|---|---|
| Opening Balance of amounts transferred to DEAF | 1.72 | 1.69 |
| Add: Amounts transferred to DEAF during the year | 0.10 | 0.06 |
| Less: Amounts reimbursed by DEAF towards claims * | -- | 0.03 |
| Closing Balance of amounts transferred to DEAF | 1.82 | 1.72 |

20. Bank has not entered into any transaction in derivatives in the current & previous year.

21. Figures for the previous year have been regrouped wherever necessary to make them comparable with the current year, and both year figures are rounded up to nearest rupee.

**ADDITIONAL DISCLOSURE AS PER RBI CIRCULAR. NO. UBD.CO.BP.PCB.20 /16.45.00 /2002-03 DT. 30.10.02**

**(Rs. In lacs)**

| Sr No | | Particulars | 31.03.2024 | 31.03.2023 |
|---|---|---|---|---|
| 1 | | **Movement of CRAR** | | |
| | a. | Capital Tier 1 | 1497.62 | 1422.97 |
| | b. | Capital Tier 2 | 113.79 | 116.60 |
| | c. | Total of Tier 1 and Tier 2 Capital | 1611.41 | 1539.57 |
| | d. | Total Risk Weighted Assets | 9108.70 | 9328.28 |
| | e. | Capital to risk assets Ratio | 17.69% | 16.50 |
| | | | | |
| 2 | | **Investments** | | |
| | a. | Book Value | 6191.51 | 7365.97 |
| | b. | Face Value | 4450.00 | 5500.00 |
| | c. | Market Value | | |
| | | | | |
| 3 | | **Advance Against** | | |
| | a. | Real Estate & Construction Business | 10.00 | 32.80 |
| | b. | Housing | 849.44 | 959.97 |
| | | | | |
| 4 | | Advance against Shares & Debentures | Nil | Nil |
| | | | | |
| 5 | | **Advances to Directors and their relatives, Companies / firms in which they are interested** | | |
| | a. | Fund-based | 20.94 | 23.21 |
| | b. | Non-fund based | Nil | Nil |
| | | | | |
| 6 | | **Average Cost of Deposits** | 5.93% | 6.26% |
| | | | | |
| 7 | | **NPAs** | | |
| | A | Gross NPAs | 1395.53 | 1545.96 |
| | B | Net NPAs | 291.25 | 944.28 |
| | C | % of Gross NPAs | 12.95% | 14.82% |
| | D | % of Net NPAs | 2.71% | 6.34% |
| | | | | |
| 8 | | Movement of NPAs | | |
| | | **GROSS NPAs** | | |
| | A | Opening Balance | 1545.96 | 1859.88 |
| | B | Additions during the year | 99.57 | 52.08 |
| | C | Less: Closed / recovered / written off | 250.00 | 366.00 |
| | D | Closing Balance | 1395.53 | 1545.96 |
| | | **NET NPAs** | | |
| | A | At the beginning of the year | 601.68 | 962.00 |
| | B | At end of the year | 261.25 | 601.68 |
| | | | | |
| 9 | | **Profitability** | | |
| | A | Interest income as percentage of working funds | 9.70% | 9.52% |
| | B | Non- Interest income as percentage of working funds | 0.67% | 0.34% |
| | c | Operating profit as a percentage of working funds | 0.08% | 0.84% |
| | d | Return on Assets | 0.37 | 0.31 |
| | e | Business ( Deposits + Advances ) per employee | 346.89 | 362.25 |
| | F | Profit per employee | 0.95 | 0.82 |
| | | | | |
| 10 | | **Provision made towards** | | |
| | a | NPAs | 190.00 | 91.00 |
| | b | Depreciation in Investments | - | 6.82 |
| | c | Restructured | - | - |
| | d | Standard Assets | 5.00 | 5.00 |
| | | | | |
| 11 | | **Movement of Provisions** | | |
| | a | **Towards NPA** | | |
| | | Opening Balance | 944.28 | 897.88 |
| | | Provision during the Year | 190.00 | 91.00 |
| | | Add: Transfer from Other Reserves | - | |
| | | Less: Closed / Recovered/Written off | - | 44.60 |
| | | Closing Balance | 1134.28 | 944.28 |
| | b | **Towards depreciation on investments** | | |
| | | Opening Balance | 6.82 | 6.56 |
| | | Additions during the year | - | 6.82 |
| | | Less Excess return back | (6.82) | (6.56) |
| | | Closing Balance | - | 6.82 |
| | c | **Standard Assets** | | |
| | | Opening Balance | 79.45 | 74.45 |
| | | Add: during the year | 5.00 | 5.00 |
| | | Less: Transfer to BDDR | - | 0 |
| | | Closing Balance | 84.45 | 79.45 |
| 12 | | **Foreign Currency Assets & Liabilities** | NA | NA |
| | | | | |
| 13 | | **DICGC premium paid up to** | Sep - 24 | Sep - 23 |

**For M/s. Vaishampayan & Padhye**
**Chartered Accountants**
**Firm Regn. No. 119380W**

sd/-

**CA Jayvant Vaishampayan**
**(Senior Partner)**
**M. No. 037420**
**Place : Alibag**
**Date : 25.06.2024**
**ICAI UDIN: 24037420BKAEVN8818**

**For Alibag Co-Operative Urban Bank Ltd.**
sd/-
**B. C. More**
**Chief Executive Officer**

**Independent Auditor's Report**
(See Section 81 and rule 69 (3) of Maharashtra Co-op Societies Act 1960)

To,
The Members,
The Alibag Co-operative Urban Bank.

**Opinion**

1. We have audited the accompanying financial statements of **The Alibag Co-operative Urban Bank (** "the Bank") as at 31 march 2024.
which comprise the balance sheet as at **31st March 2024**, Profit & Loss Account and cash flow statement for the year ended on that date, significant accounting policies and Other explanatory information .the return of head office and its departments and 58 branches audited by us and the return of others branches audited by concurrent auditor of the respective branches are consolidated in these financial statement.

In our opinion and to the best of our information and according to the explanation given to us , the aforesaid financial statement together with the notes thereon given the information required by the Banking Regulation act ,1949, As amended by the banking regulation act 2020 (AACS) the Maharashtra State Cooperative Societies Act 1960 (Amended in 2014) and rules made there under and the guideline issued by Reserve Bank Of India and the Registrar of Cooperative Societies, in the manner so required and give a true and fair view in conformity with the accounting principle generally accepted in India .

(a) In the case of the Balance sheet, of State of affair of the Bank as On 31st March 2024, and
(b) In the case of the Profit and Loss Account, of the profit for the Year ended on the date, and
(c) In the case of the Cash Flow Statement, of the cash flow for the Year ended on the Date.

**Basic of Opinion**

**2.** The Bank is recognizing income on interest subvention claims send to Central Government and Sate Government for KCC Scheme partially on receipt basis. such interest income is required to be accounted on accrual basis as per the Accounting Standard 9 "Revenue Recognition " .

**3.** We conducted our audit in accordance with the Standard on Auditing (SAs) issued by ICAI (Institute of Chartered Accountants of India). Our responsibility under those Standard on auditing (SAs) are further described in the Auditors Responsibility for the Audit of the Financial Statement section of our report .We are independent of the entity in accordance with the code of Ethics issued by ICAI together with ethical requirements that are relevant to our audit of the financial statements under the provision of the Co-operative Societies Act, 1960 (Amended in 2014) and the rules made there under and the Banking Regulation Act, 1949 (As applicable to co-operative societies) as amended by the Banking regulation (Amendment Act, 2020) and guideline issued by Reserve Bank of India, We have fulfilled our other ethical responsibilities in accordance with the Code Of Ethics issued by ICAI.
We believe that the audit evidence we have obtained is sufficient and appropriate to provide a basis for our opinion.

**4. Responsibility of Management and those Charged with Governance for the Financial Statements**

The Bank's Management & Board of Directors are responsible for the preparation of these financial statements that give a true & fair view of the financial position, financial performance and cash flow of the Bank in accordance with the accounting principles generally accepted in India, including the accounting standards issued by the ICAI. This responsibility also includes maintenance of adequate accounting records in accordance with the provisions of the State Co-operative Societies Act ,1960 (amended in 2014) & the rules there under Banking Regulation Act ,1949 ( As applicable to Co-operative Societies) as amended by Banking Regulation (Amendment) Act,2020 and the guidelines issued by the Reserve Bank of India . For Safeguarding of the assets of the bank and for preventing & detecting frauds and other irregularities, selection and application of appropriate accounting policies , making judgments and estimates that are reasonable and prudent , and design ,implementation and maintenance of adequate internal financial controls, that were operating effectively for insuring the accuracy and completeness of the accounting records, relevant to the preparation and presentation of the financial statements that give a true and fair view and are free from material misstatement , whether due to fraud or error.

In preparing the financial statement , management and board of directors is responsible for assessing the entity's ability to continue as going concern, disclosing ,as applicable ,matter related to going concern and using the going concern basis of accounting unless management either intends to liquidate the entity or to cease operations, or has to no realistic alternative but to do so .
Those charged with governance are responsible for overseeing the entity's financial reporting process.

**Auditor's Responsibility for the Audit of Financial Statement**

**6.** Our objectives are to obtain reasonable assurance about whether the financial statement as whole is free from material misstatement whether due to fraud or error and to issue auditors report that include our opinion .reasonable assurance is high level of assurance, but it is a guarantee that an audit conducted in accordance with SAs, will always detect a material misstatement when it exist .misstatement can arise from fraud or error and are considered material if, individually or in aggregate they could reasonably be expected to influence the economic decision of user taken on the basis of the financial statement.

As part of an audit in accordance with SAs, we exercise professional judgment and maintain professional skepticism throughout the audit .we also:

- Identify and assess the risk of material misstatement of the financial statement , whether due to fraud and error ,design and perform audit procedures responsive to those risks, and obtain audit evidence that is sufficient and appropriate to provide a basis for our opinion .the risk of not detecting a material misstatement resulting from fraud is higher than for one resulting from error ,as fraud may involve collusion ,forgery ,intentional omissions, misrepresentations ,or the override of internal control .
- Obtain an understanding of internal controls relevant to the audit in order the design audit procedures that are appropriate in the circumstances ,but not for that purpose of expressing an opinion on the effectiveness of the entity's internal control
- Evaluate the appropriateness of accounting policies used and the reasonableness of accounting estimates and related disclosure made by management
- Conclude on the appropriateness of management's use of the going concern basis of accounting and, based on the audit evidence obtained, whether a material uncertainty exists related to events or conditions that may cast significant doubt on the entity's ability to continue as a going concern. If we conclude that a material uncertainty exists, we are required to draw attention in our auditor's report to the related disclosures in the financial statements or, if such disclosures are inadequate, to modify our opinion. Our conclusions are based on the audit evidence obtained up to the date of our auditor's report. However, future events or conditions may cause the entity to cease to continue as a going concern.
- Evaluate the overall presentation, structure and content of financial statements, including the disclosures, and whether the financial statements represent the underline transactions and events in a manner that achieves fair presentation.

We communicate with those charged with governance regarding, among other matters, the planned scope and timing of the audit and significant audit findings. Including any significant deficiencies in internal control that we identify during our Audit.

We also provide those charged with governance with a statement that we have Complied with relevant ethical requirements regarding independence, and to communicate with them all relationships and other matters that may reasonably be thought to bear on our independence, and where applicable, related safeguards.

**Report on Other Legal & Regulatory Requirements**

Balance Sheet & Profit & Loss Account have been drawn up in forms "A" & "B" respectively of the third schedule of the Banking Regulation Act ,1949 (as amended in 2020) & State Co-operative Societies Act ,1960 (amended act in 2014) the State Co-operatives Rules ,1961 .

As required by Section 81 and rule 69 (3) of Maharashtra Co-op Societies Act 1960, subject to our comments in LFAR & annexure thereto,

We report that: We have obtained all the information and explanations, which to the best of our knowledge and belief were necessary for the purpose of our audit and have found to be satisfactory.

a) In our opinion, proper books of account as required by said act, rules framed there under and the bye-laws, have been kept by the Bank so far as it appears from our examination of those books and proper returns adequate for the purposes of our audit have been received from the branches or offices.

b) The transactions of the Bank which came to our notice have been with in the powers of the Bank

c) The Balance Sheet, Profit & Loss Account & Cash flow statement dealt with by these reports, are in agreement with the books of account and the returns

d) The accounting standards adopted by the Bank are consistent with those laid down by the Institute of Chartered Accountant of India.

e) In our opinion and according to information and explanations given to us ,we have not notice any material impropriety or irregularity in the expenditure or in the realization of money due to the Bank .

f) The Bank is awarded 'B" audit classification for the year 2023-24 based on our assessment of CAMELS rating application to Cooperative Banks.

**For M/s. Vaishampayan & Padhye**,
Chartered Accountants
Firm Registration No. 119380W

sd/-

**CA Jayvant Vaishampayan**
(Senior Partner)
M.No: 037420
Place: Alibaug
Date:25.06.2024
ICAI UDIN: 24037420BKAEVN8818

# पनवेल महानगरपालिकेच्यावतीने प्लास्टिक विरोधी कारवाई

## ●३७ किलो प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त, ●२१ हजाराचा दंड वसूल



**। पनवेल । वार्ताहर ।**

आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानुसार पनवेल महानगरपालिकेच्या खारघर, कळंबोली, कामोठा या तीन प्रभागांमध्ये आज प्लास्टिक विरोधी कारवाई करण्यात आली. यामध्ये सुमारे ३७ किलो सिंगल युज प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त करण्यात आला. तसेच सुमारे २१ हजाराचा दंड वसूल करण्यात आला. पनवेल महानगरपालिका क्षेत्रात आज मोठी प्लास्टिक विरोधी कारवाई करण्यात आली. यामध्ये प्रभाग समिती 'अ ' खारघर प्रभागामध्ये रेल्वे स्टेशन येथे परिसरात प्लास्टिक पिशवी बंदी कारवाई दरम्यान रु ५ हजार रूपयांचा दंड आकारण्यात आला. या कारवाईमध्ये सुमारे ०५ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले.

प्रभाग समिती 'ब' कलंबोली प्रभागामध्ये आज प्रभाग क्रमांक ९ आणि प्रभाग क्रमांक १० कळंबोली येथील भाजीमार्केट, फळ विक्रेते व हॉटेल व्यवसायिक यांच्यावरती प्लास्टिक पिशवी बंदी कारवाई करण्यात आली. या कारवाईमध्ये अंदाजे १० किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले व ११ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला. प्रभाग समिती 'क' अंतर्गत कामोठा-कळंबोली विभागाच्या माध्यमातून आज खांदा कॉलनी वार्ड १४ व १५ येथील भाजी मार्केट व फळ विक्रेते व हॉटेल यांच्यावरती प्लास्टिक पिशवी बंदी कारवाई करण्यात आली.

या कारवाईमध्ये अंदाजे २२ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले व ५ हजार दंड वसूल करण्यात आला. सदर ठिकाणी मुख्य आरोग्य निरीक्षक शैलेश गायकवाड व स्वच्छता निरीक्षक, पर्यवेक्षक व स्वच्छता दूत उपस्थित होते.

पनवेल महापालिका क्षेत्रात एकल वापर प्लास्टिकवरती प्रतिबंध करण्यात आला आहे. उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांच्या यांच्या सूचनेनुसार प्रतिबंधित प्लास्टिकची साठवणूक, विक्री आणि वापर करणाऱ्यांवर महानगरपालिकेच्यावतीने कठोर कारवाई करण्यात येत आहे. केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने अधिसूचना जारी केली आहे.

तसेच सुधारित प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियम २०१६ नियम ४(२) अन्वयानुसार एकल वापर प्लास्टिकचे उत्पादन, आयात, साठवण, वितरण विक्री आणि वापरांवर बंदी करण्यात आली आहे. प्लास्टिक विरोधी कारवाईमध्ये पहिला गुन्हा नोंद झाल्यावर ५ हजार रुपये, दुसरा गुन्हा नोंद झाल्यावर १० हजार रुपये, तिसरा गुन्हा नोंद झाल्यावर २५ हजार रूपये दंड आणि तीन महिन्याचा कारावास असणार आहे.

# सैनिकी स्कूल परीक्षेतील यशाचे कौतुक

**। पनवेल । वार्ताहर ।**

सैनिकी स्कूलच्या खडतर परीक्षेत यश संपादन करून देशभरामध्ये विविध शाळांमध्ये प्रवेश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा आय कॅन ट्रेनिंग इन्स्टिट्यूटच्या वतीने नुकताच गुणगौरव करण्यात आला. या प्रशिक्षण केंद्रामध्ये अभ्यास करून या मुलांनी यश मिळवले. त्यांच्या पाठीवर एक प्रकारे कौतुकाची थाप देण्यात आली.

देशभरामध्ये विविध शहरांमध्ये सैनिकी स्कूल आहेत. अत्यंत दर्जेदार शिक्षण, त्याचबरोबर शिस्तप्रियता, देशप्रेम याव्यतिरिक्त आयएएस, आयपीएस आणि एनडीएमध्ये जाण्यासाठी खडतर प्रशिक्षण आणि शिक्षण देणाऱ्या या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना सहज प्रवेश मिळत नाही. त्यासाठी दरवर्षी प्रवेश परीक्षा घेतली जाते. प्रचंड स्पर्धा आणि त्याचबरोबर अत्यंत अवघड ही परीक्षा असते. कळंबोली येथे आय कॅन ट्रेनिंग इन्स्टिट्यूटमध्ये विद्यार्थ्यांना यासाठी तयार केले जाते. त्यांना अभ्यासक्रम शिकून त्यांची पूर्णपणे तयारी करून घेतली जाते. आय कॅन या संस्थेने अनेक विद्यार्थी आजपर्यंत घडवले आहेत. एक नामांकित प्रशिक्षण संस्था म्हणून देशभरामध्ये या इन्स्टिट्यूटचे नाव घेतले जाते. देशभरातील जवळपास प्रत्येक सैनिकी शाळेमध्ये आय कॅनने घडवलेले विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यामध्ये कळंबोली येथील केंद्र हे आघाडीवर आहे. दरवर्षी मोठ्या प्रमाणात सैनिकी स्कूल परीक्षेमध्ये विद्यार्थी यशस्वी होतात. त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्याच्या उद्देशाने त्याचबरोबर या पुढील वर्षांमध्ये परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी या हेतूने आय कॅन ट्रेनिंग इन्स्टिट्यूट कळंबोलीच्या संचालिका सीमा जगताप यांनी सैनिकी स्कूल मार्गदर्शन आणि विद्यार्थी गुणगौरव समारंभाचे कळंबोली येथील ससून हॉलमध्ये आयोजन केले होते.

निवडक

## पाकिस्तानला लागली मिर्ची

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट संघाने टी-२० विश्वचषकात चमकदार कामगिरी करत उपांत्य फेरीत आपले स्थान निश्चित केले आहे. विश्वचषकातील भारताची चमकदार कामगिरी पाकिस्तानच्या माजी क्रिकेटपटूंना आवडलेली नाही. यामुळेच भारत-ऑस्ट्रेलिया सामन्यानंतर पाकिस्तानचे दिग्गज क्रिकेटपटू आणि माजी कर्णधार इंझमाम उल हक याने भारतीय संघावर खळबळजनक आरोप केला आहे. इंझमामने ऑस्ट्रेलियाविरुद्ध गोलंदाजी करताना भारतीय संघावर बॉल टॅम्परिंगचा आरोप केला होता.

## दुखापतीची ॲक्टींग महागात

**फ्लोरिडा :** मंगळवारी टी-२० विश्वचषकातील सुपर-८चा बांगलादेशचा सामना अफगाणिस्तानशी झाला. या सामन्यादरम्यान गुलबदीन नैब चर्चेत होता. खरे तर सामन्यादरम्यान अफगाणिस्तानचे प्रशिक्षक जोनाथन ट्रॉट यांनी ड्रेसिंग रूममधून सामना स्लो करण्याचे संकेत दिले होते. गुलबदीनने प्रशिक्षकाचा इशारा पाहताच मैदानात पडून जखमी झाल्याचे नाटक केले. मात्र, ही सबब करणे आता गुलबदीनला महागात पडू शकते. आयसीसी या खेळाडूवर उपांत्य फेरीच्या सामन्यातही बंदी घालू शकते.

## रिकी पॉंटींगचा इशारा

**फ्लोरिडा :** वॉर्नरच्या निवृत्तीबद्दल आयसीसीशी बोलताना पॉंटिंग म्हणाला, मी माझा हात त्याच्या गळ्यात टाकला आणि त्याला म्हणालो, आजच्या सामन्यानंतर एकांतात शांत बस आणि ऑस्ट्रेलियासाठी तिन्ही प्रकारात तुझी किती शानदार कारकिर्द राहिली, याचा विचार कर. आपल्याला माहित आहे, तो कसोटी क्रिकेटमधून आधीच निवृत्त झाला आहे, पण डेव्हिड वॉर्नरचा जो प्रभाव ऑस्ट्रेलियन क्रिकेटमध्ये तिन्ही प्रकारात होता, तसा खेळाडू शोधण्यासाठी तुम्हाला संघर्ष करावा लागेल.

## राखीव दिवस नाही

**फ्लोरिडा :** टी-२० विश्वचषकाच्या स्पर्धेच्या उपांत्य फेरीतील दुसरा सामना भारत विरुद्ध इंग्लंड संघात खेळवला जाणार आहे. या सामन्यासाठी आयसीसीने राखीव दिवस ठेवला आहे. मात्र भारत आणि इंग्लंड संघात होणाऱ्या उपांत्य सामन्यासाठी आयसीसीने राखीव दिवस ठेवलेला नाही. यामुळे वेळ आणि प्रवास हे मुख्य कारण असल्याचे सांगण्यात येत आहे. तसेच, शुक्रवारी प्रवासाचा दिवस असल्याने या सामन्यासाठी राखीव दिवसाची व्यवस्था करण्यात आलेली नाही.

## बटलरने फुंकले रणशिंग

**फ्लोरिडा :** भारत विरुद्ध इंग्लंड या सामन्यात विजय मिळवणारा संघ अंतिम सामन्यात दाखल होणार आहे, तर पराभूत होणाऱ्या संघाचे आव्हान संपणार आहे. या सामन्यापूर्वी इंग्लंडचा कर्णधार जॉस बटलरने आपली प्रतिक्रिया दिली आहे. त्याने म्हटले आहे की, भारतीय संघ आक्रमक खेळला, तर इंग्लंडही तसेच प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न करेल. त्याचबरोबर बटलरने भारताचा कर्णधार रोहित शर्माने ऑस्ट्रेलियाविरुद्ध केलेल्या ४१ चेंडूतील ९२ धावांच्या खेळीचेही कौतुक केले आहे.

# थरार रंगणार उपांत्य फेरींचा

### भारत थेट अंमित सामन्यात?

**। गयाना । वृत्तसंस्था ।**
**टी-२० विश्वचषक स्पर्धा आता अंतिम टप्प्यात आली आहे. वेस्ट इंडिज आणि अमेरिका येथे खेळवण्यात आलेली ही स्पर्धा अनेक गोष्टींमुळे ऐतिहासिक ठरली. यंदा पहिल्यांदाच टी-२० विश्वचषकात २० संघ सहभागी झाले होते. त्यामुळे अनेक धक्कादायक निकालही या स्पर्धेत पाहायला मिळाले, तर बऱ्याच बलाढ्य संघाचे आव्हानही लवकर संपले. यात पाकिस्तान, न्यूझीलंड, ऑस्ट्रेलिया अशा काही संघांचा समावेश आहे. दरम्यान, आता या स्पर्धेतील अंतिम ४ संघ मिळाले आहेत. भारत, दक्षिण आफ्रिका, अफगाणिस्तान आणि इंग्लंड हे चार संघ उपांत्य फेरीत पोहचले आहेत.**

उपांत्य फेरीतील संघांची कामगिरी उपांत्य फेरीत पोहचलेल्या चार संघांपैकी भारत आणि दक्षिण आफ्रिका हे दोन्ही संघ आत्तापर्यंत अपराजित आहेत. भारताने पहिल्या फेरीत तीन सामने जिंकले होते. एक सामना पावसामुळे रद्द झाला होता. तर, सुपर-८ मधील तिन्ही सामने भारताने जिंकले आहेत. दक्षिण आफ्रिकेने पहिल्या फेरीतील चार आणि सुपर-८ फेरीतील तीन असे सलग ७ सामने जिंकले आहेत.

लढवय्या अफगाणिस्तानने अनेक मोठ्या संघांना पाणी पाजत पहिलांदाच सेमीफायनल गाठली आहे. अफगाणिस्तानने पहिल्या फेरीत तीन विजय आणि एक पराभव पाहिला होता. तसेच, सुपर-८ फेरीत तीन सामन्यांपैकी दोन सामने जिंकले, तर एक पराभव स्विकारला लागला होता. गतविजेत्या इंग्लंडनेही सुरुवातीच्या संघर्षानंतर चांगली लय पकडली आहे. इंग्लंडने पहिल्या फेरीत चार सामन्यांपैकी दोन सामने जिंकले, तर एका सामन्यात पराभव स्विकारला आहे. तसेच, एक सामना पावसामुळे रद्द झाला होता. सुपर-८ फेरीत इंग्लंडने तीन सामन्यांपैकी २ सामने जिंकले आणि १ सामना पराभूत झाले आहेत.

आता या स्पर्धेतील अंतिम ४ संघ निश्चित झाल्याने उपांत्य फेरीत कसे सामने होणार हे देखील स्पष्ट झाले आहे. उपांत्य फेरीतील पहिला सामना दक्षिण आफ्रिका विरुद्ध अफगाणिस्तान यांच्यात तौरोबाला होणार आहे. हा सामना भारतीय प्रमाणवेळेनुसार गुरुवारी (दि.२७) पहाटे ६ वाजता सुरू होणार आहे. तर, दुसरा उपांत्य सामना भारत विरुद्ध इंग्लंड संघात गयानाला रंगणार आहे. हा सामनाही गुरुवारीच भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री ८ वाजता होणार आहे.




### सामन्यावर पावसाचे सावट

भारत विरुद्ध इंग्लंडचा सामना गयानामध्ये होत असून हवामानाचा अंदाजानुसार पुढील आठवडाभर येथे मुसळधार पाऊस अपेक्षित आहे. तसेच गुरूवारी ही गयानामध्ये मुसळधार पावसाचा अंदाज वर्तविण्यात आलेला आहे. सामना सुरू असताना हवामान चांगले राहण्याची अपेक्षा असली तरी सामना सुरू होण्यापूर्वी पाऊस झाल्यास मैदान ओले असल्याने खेळ सुरू होण्यास उशीर होऊ शकतो. यामुळे हा सामना पावसामुळे रद्द होण्याची शक्यता आहे.

### सामना रद्द झाला तर?

स्पर्धा सुरू होण्यापूर्वी, आयसीसीने जाहीर केले होते की त्याच दिवशी दुसरा उपांत्य सामना आयोजित करण्यासाठी सर्व शक्य प्रयत्न केले जातील आणि या प्रयत्नात दुसऱ्या उपांत्य फेरीच्या सामन्यासाठी २५० मिनिटांचा अतिरिक्त वेळ जोडण्यात आला आहे. हा सामना काही कारणास्तव रद्द झाला तरी भारत अंतिम फेरीत प्रवेश करेल. भारतीय संघाने सुपर-८ मध्ये इंग्लंडपेक्षा जास्त गुण मिळवले होते. त्यामुळे भारताला याचा फायदा होणार आहे.






## ब्रायन लाराचा विश्वास सार्थ

**। फ्लोरिडा । वृत्तसंस्था ।**
अफगाणिस्तानने मंगळवारी बांगलादेशला पराभूत करीत टी-२० विश्वचषकाची उपांत्य फेरी गाठली. उपांत्य फेरी गाठण्याची त्यांची ही पहिलीच वेळ आहे. याप्रसंगी अफगाणिस्तानचा कर्णधार राशीद खान याने ब्रायन लाराबद्दल आदर व्यक्त करताना म्हटले की, ब्रायन लारा या एकमेव व्यक्तीने आमचा संघ उपांत्य फेरीत पोहोचणार, असे म्हटले होते. त्यानंतर आम्ही ब्रायन लाराला भेटलो, तेव्हा तुमचा विश्वास सार्थ ठरवण्याचा सर्वोत्तम प्रयत्न करू, असे आमच्याकडून त्यांना सांगण्यात आले होते.

राशीद खान पुढे म्हणाला, ब्रायन लारासारख्या महान व्यक्तीने आमच्याबद्दल विश्वास दाखवल्यानंतर खेळाडूंमध्ये नवा उत्साह संचारतो. आम्ही साध्या पद्धतीच्या खेळावर लक्ष केंद्रित केले. काही वेळा आमच्यासमोर आव्हानात्मक स्थिती होती; पण आम्ही दबावाखाली ढेपाळलो नाही. त्यामधून बाहेर आलो. १९ वर्षांखालील स्पर्धेत आमच्याकडून चमकदार खेळ झाला होता; पण वरिष्ठ गटाच्या आयसीसी स्पर्धांमध्ये आम्हाला सुपर आठची फेरीही गाठता आली नव्हती. त्यामुळे अफगाणिस्तानचा संघ पहिल्यांदाच उपांत्य फेरीत पोहोचणारी घटना देशवासीयांचा आनंद द्विगुणीत करणारी आहे. असेही राशीद खान म्हणाला.

## मात्तिया झाक्कानी इटलीचा तारणहार

**। लायपझिग । वृत्तसंस्था ।**
बदली खेळाडू मात्तिया झाक्कानी इटलीचा तारणहार ठरला. त्याने भरपाई वेळेतील अखेरच्या आठव्या मिनिटालस प्रेक्षणीय गोल केला. त्या बळावर विजयाच्या द्वारी असलेल्या क्रोएशियाला १-१ असे गोलबरोबरीत रोखून गतविजेत्यांनी युरो करंडक फुटबॉल स्पर्धेच्या बाद फेरीत प्रवेश केला.



इटली व क्रोएशिया यांच्यातील सामन्याचा उत्तरार्ध रंगतदार, तेवढाच नाट्यमय ठरला. विश्रांतीनंतर लगेच इटलीचा बदली खेळाडू डेव्हिड फ्रात्तेसी याने चेंडू हाताळल्याबद्दल व्हीएआर पडताळणीनंतर क्रोएशियाला पेनल्टी फटका मिळाला. त्यांचा सर्वाधिक अनुभवी खेळाडू लुका मॉड्रिच याच्या फटक्याचा इटालियन गोलरक्षक जाईनलुईजी डोन्नारुम्मा याने अचूक अंदाज बांधला आणि डावीकडे झेपावत चेंडू अडविला. गोल करण्याची हुकलेली सुरेख संधी मॉड्रिचने लगेच पुढच्या मिनिटाला मैदानी गोलने साधली. ५५व्या मिनिटाला अँटे बुदिमिर याचा फटका डोन्नारुम्मा याने रोखल्यानंतर मॉड्रिचने क्रोएशियाला रिबाऊंडवर आघाडी मिळवून दिली. मात्र, ८१व्या मिनिटाला मैदानात उतरलेला २९ वर्षीय झाक्कानी याने ९०+८ व्या मिनिटास रिकार्डो कालाफिओरी याच्या साह्यावर अप्रतिम फटक्यावर गोल केला आणि इटलीने १-१ अशी बरोबरी साधली.

## पनौती अंपायरपासून सुटका

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**
टी-२० विश्वचषकातील उपांत्य फेरी गुरूवारी होत असून आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने या दोन्ही बाद फेरीच्या सामन्यांसाठी सामना अधिकाऱ्यांची घोषणा केली आहे. रिचर्ड इलिंगवर्थ आणि नितीन मेनन हे अफगाणिस्तान आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात खेळल्या जाणाऱ्या पहिल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात मैदानावरील पंच म्हणून काम पाहतील. या सामन्यात टीव्ही पंच म्हणून रिचर्ड केटलबरो, तर अहसान रझा हे चौथे पंच असतील. तर, भारत आणि इंग्लंड यांच्यातील दुसऱ्या उपांत्य फेरीच्या सामन्याबद्दल बोलायचे झाले तर, या सामन्यात ख्रिस गॅफनी आणि रॉडनी टकर हे मैदानावरील पंच म्हणून काम पाहतील. जोएल विल्सन या सामन्यात टीव्ही पंच तर पॉल रीफेल चौथे पंच म्हणून काम पाहतील.



यामुळे रिचर्ड कॅटलबरो अंपायरपासून भारतीय संघाची सुटका झाली असल्याची चर्चा रंगू लागली आहे. रिचर्ड केटलबरोचे अनेक निर्णय भारतीय संघाच्या विरोधात गेले आहेत. विशेष म्हणजे रिचर्डचे हे निर्णय केवळ बाद फेरीत भारताविरुद्ध गेले आहे. त्यामुळे ते भारतीय संघासाठी फारच अशुभ सिद्ध झाले आहेत.

## सुर्याची अव्वल स्थानावरून घसरण

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**
आयसीसीने बुधवारी (दि.२६) ताजी टी-२० क्रमवारी जाहीर केली आहे. या ताज्या क्रमवारीनुसार आता फलंदाजांच्या यादीत मोठे बदल झाले असून भारताचा स्टार फलंदाज सूर्यकुमार यादवला आपला अव्वल क्रमांक गमवावा लागला आहे. मात्र, हार्दिक पांड्या, जसप्रीत बुमराह आणि कुलदीप यादव यांनी मोठी झेप घेतली आहे.




टी-२० विश्वचषकातील सुपर-८ फेरीनंतर आयसीसीने ही क्रमवारी जाहीर केली आहे. या टी-२० विश्वचषकात सूर्यकुमारच्या कामगिरीत फारसे सातत्य दिसले नाही. त्याला गेल्या काही काळातील कामगिरीत सातत्य नसल्याचा फटका बसला असून आता त्याला टी-२० फलंदाजी क्रमवारीतील ऑस्ट्रेलियाचा सलामीवीर ट्रेविस हेडने मागे टाकत अव्वल क्रमांक मिळवला आहे. त्यामुळे आता हेड अव्वल क्रमांकावर विराजमान झाला आहे.

सूर्यकुमार डिसेंबर २०२३ पासून टी-२० फलंदाजी क्रमवारीत अव्वल क्रमांकावर होता. पण अखेर टी-२० विश्वचषकातील शानदार कामगिरीमुळे हेडने त्याच्याकडून हे स्थान मिळवले आहे. हेडने या क्रमवारीत ४ स्थानांची उडी घेत सूर्यकुमारसह फिल सॉल्ट, बाबर आझम आणि मोहम्मद रिझवान यांनाही मागे टाकले आहे. याशिवाय या क्रमवारीत पहिल्या १० फलंदाजांमध्ये जॉन्सन चार्ल्सनेही स्थान मिळवले आहे. तो आता चार स्थानांनी पुढे येत १० व्या क्रमांकावर आला आहे.

## वॉर्नरच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीचा शेवट

**। न्यूयॉर्क । वृत्तसंस्था ।**
बांगलादेशचा पराभव होताच ऑस्ट्रेलियाचे विश्वचषकमधील आव्हान संपुष्टात आले होते. याचबरोबर डेव्हिड वॉर्नरने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. त्याने आपली १५ वर्षांची देदिप्यमान कारकीर्द संपवली आहे.



भारतात गेल्या वर्षी झालेल्या एकदिवसीय विश्वचषकमध्ये ऑस्ट्रेलियाने भारताचा पराभव करत विजेतेपद पटकावले. डेव्हिड वॉर्नर हा एकदिवसीय विश्वचषकानंतर एकदिवसीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली होती. यानंतर त्याने पाकिस्तान विरूद्धच्या कसोटी सामना झाल्यानंतर कसोटीमधून निवृत्ती घेतली होती. आता वॉर्नरने टी-२० विश्वचषकनंतर टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती घेतली आहे. ऑस्ट्रेलियाचा सुपर ८ मध्ये भारताने पराभव केला. त्यामुळे डेव्हिड वॉर्नरचा तो शेवटचा आंतरराष्ट्रीय टी-२० सामना ठरला.

## शाळांच्या मैदानात रंगणार खेळांचा थरार

**। अलिबाग । प्रमोद जाधव ।**
जिल्ह्यातील शाळा १५ जूनपासून सुरू झाल्या आहेत. शाळांमध्ये शिकविण्याचे काम सुरु झाले आहे. त्यामध्ये एक तास शारिरीक शिक्षणासाठी दिला जात असून शाळांमधील मैदानात पावसाळी खेळांचा थरार ऑगस्ट महिन्यात रंगणार असल्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्यामुळे शिक्षणाबरोबरच विद्यार्थी, विद्यार्थीनींची शारीरीक क्षमता वाढविण्यासाठी हा उपक्रम राबविला जाणार असल्याचे बोलले जात आहे.

शाळांमध्ये अभ्यासाव्यतिरिक्त वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. तसेच, मुलांची बौध्दीक क्षमता वाढावी यासाठी त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी शाळांमध्ये चित्रकला, वक्तृत्व, भित्तीपत्रक, गायन, नृत्य स्पर्धा घेतली जातात. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी हा एक प्रयत्न केला जातो. त्याचाच एक भाग म्हणून विद्यार्थ्यांची शारिरीक क्षमता वाढविण्यासाठी क्रिडा स्पर्धा भरविल्या जातात. नव्या वर्षात प्रवेश घेतल्यावर अनेक विद्यार्थ्यांना या क्रिडा स्पर्धेचा आनंद प्रत्यक्षात घेण्याची संधी मिळते. वेगवेगळ्या वर्गातील विद्यार्थी आपला संघ जिंकण्यासाठी प्रचंड मेहनत घेत असतात.

जूलै महिना संपण्याच्या मार्गावर असताना जिल्ह्यातील शाळांमध्ये शालेय क्रीडा स्पर्धेला सुरुवात होणार आहे. पाऊस कमी झाल्यावर ऑगस्ट महिन्यात या स्पर्धा घेतल्या जाण्याची शक्यता वर्तविली जात आहे. या स्पर्धांमध्ये कबड्डी, खो-खो, धावणे सारखे अनेक खेळांचे सांघिक व वैयक्तीक प्रकार घेतले जाणार आहेत.

मोबाईलच्या जगतामध्ये रमणारी पिढी अशी ओरड कायमच असते. तासनतास ही मुले मोबाईलमधील खेळांमध्ये मग्न असल्याने त्याचा त्रास त्यांच्या आरोग्यावर होण्याची भिती अधिक असते. त्यामुळे शाळांमध्ये होणाऱ्या क्रीडा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांचे शरीर तंदुरुस्त राहण्यास मदत राहणार आहे.

> **शाळांमध्ये पावसाळी वेगवेगळे खेळ भरविणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांमध्ये खेळाची आवड निर्माण व्हावी. मैदानी खेळाचे महत्व समजावे. मैदानी खेळ महत्वाचे आहेत, याची जाणीव क्रीडा स्पर्धेतून देणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांची शारीरिक क्षमता वाढण्यास देखील खेळ महत्वाचे ठरत आहेत.**
> **- बीपीन शेळके, सेवानिवृत्त शिक्षक**

## राज्य पॅनलवर पंच परीक्षा

**। रायगड । क्रीडा प्रतिनिधी ।**
महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन राज्य पॅनलवर पंचांची नियुक्ती करण्यासाठी जुलै व ऑगस्टमध्ये परीक्षा आयोजित करणार असून हि परीक्षा १८ वर्षा वरील सर्व उमेदवारांसाठी खुली आहे. परीक्षा शुल्क ५०० अधिक जीएसटी म्हणजे ५९० रुपये एवढी असेल. परीक्षेसाठी नोंदणी करण्यासाठी अंतिम तारीख ३ जुलै असून या तारखेनंतर प्राप्त झालेल्या नोंदणी स्वीकारल्या जाणार नाहीत. पंच परीक्षेसाठी नोंदणी लिंक https://bit.ly/4ckbUOb असून नोंदणी फॉर्ममध्ये प्रदान केलेल्या एमसीए कोडवर शुल्क भरणा करणे आवश्यक आहे. भरणा केल्याचा पुरावा (स्क्रिनशॉट) अपलोड करणे आवश्यक आहे. नोंदणीच्या अंतिम तारखेनंतर सर्व उमेदवारांना अभ्यासक्रम, स्वरूप आणि परीक्षेचे वेळापत्रक कळवले जाईल. प्राप्त झालेल्या नोंदणीच्या संख्येवर अवलंबून, महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन मुख्य राज्य पॅनल परिक्षेपूर्वी प्राथमिक तपासणी परीक्षा आयोजित करू शकते. नोंदणीमध्ये चुकीची माहिती दिली असल्यास किंवा परीक्षा शुल्क न भरल्यास नोंदणी न स्वीकारण्याचा अधिकार महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन राखून ठेवतो. अधिक माहितीसाठी अजय देशपांडे ९८२३४४०५०५ यांच्याशी संपर्क आवाहन करण्यात येत आहे.

### पुन्हा भारत-पाकिस्तान सामना रंगणार

# आशिया चषकाचे वेळापत्रक जाहीर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**
**आशिया क्रिकेट काऊन्सिलने मंगळवारी मोठी घोषणा केली असून आगामी महिला आशिया चषक स्पर्धेचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. यंदा देखील ही स्पर्धा टी-२० प्रकारात खेळवली जाणार आहे. या स्पर्धा श्रीलंकेत आयोजित केली जाणार असून डंबुलामध्ये सामने खेळले जाणार आहेत. १९ जूलै रोजी स्पर्धेला सुरूवात होणार असून २८ जुलै रोजी अंतिम सामना होणार आहे.**

या स्पर्धेत आशिया खंडातील ८ महिला संघ सहभागी होणार आहेत. या ८ संघांची साखळी फेरीसाठी दोन गटात विभागणी करण्यात आली आहे. भारतीय महिला संघाचा साखळी फेरीसाठी 'अ' गटात समावेश असून भारताव्यतिरिक्त पाकिस्तान, युएई आणि नेपाळ या देशांच्या महिला संघांचा समावेळ आहे. 'बी' गटात बांगलादेश, श्रीलंका, मलेशिया आणि थायलंड या देशांच्या महिला संघांचा समावेश आहे. साखळी फेरीनंतर दोन्ही गटातील अव्वल दोन संघ उपांत्य फेरीत प्रवेश करतील. यावेळी उपांत्य फेरीत विजय मिळवणारे संघ अंतिम सामन्यात प्रवेश करणार आहेत. साखळी फेरीत प्रत्येक दिवशी दोन सामने होणार आहेत. एक सामना दुपारी २ वाजता, तर दुसरा सामना संध्याकाळी ७ वाजता चालू होणार आहे.




साखळी फेरीत भारताचा पहिला सामना १९ जुलै रोजी पाकिस्तान विरुद्ध खेळवला जाणार असून त्यानंतर २१ जुलै रोजी युएईविरुद्ध भारताचा सामना होईल, तर नेपाळविरुद्ध २३ जुलैविरुद्ध भारताचा अखेरचा साखळी सामना होईल. या स्पर्धेतील सर्व सामनाधिकारी महिला असणार आहेत, हे यंदाच्या स्पर्धेचे वैशिष्ट्य आहे.

## तालिबानने मानले भारताचे आभार

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**
यंदाच्या आयसीसी टी-२० विश्वचषकात अफगाणिस्तान संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरला आहे. अफगाणिस्तान संघाने बांगलादेशचा पराभव करुन उपांत्य फेरीत धडक मारली. त्यामुळे देशातील करोडो क्रिकेट चाहतेही याचा आनंद साजरा करण्यासाठी रस्त्यावर जल्लोष करत आहेत. अफगाणिस्तानच्या या उत्कृष्ट कामगिरीमुळे देशात सत्तेवर असलेल्या तालिबानने भारताला खास संदेश दिला आहे. आम्ही भारताचे आभारी आहोत की त्यांनी अफगाणिस्तान संघांच्या जडणघडणीत मोलाचा वाटा उचलला. त्यांनी दिलेले योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. भारताने गेल्या १० वर्षांत अफगाणिस्तान क्रिकेटच्या विकासासाठी भारताने फक्त आर्थिक आणि तांत्रिक मदत केली नाही, तर मैदानसुद्धा दिले आहेत. डेहराडून हे फार पूर्वीपासून अफगाणिस्तानचे घरचे मैदान आहे. अफगाणिस्तानसोबत द्विपक्षीय मालिका खेळण्यासाठी परदेशी संघ डेहराडूनला येत होते. परंतू, आता आयपीएलमध्येही अफगाणिस्तानच्या खेळाडूंना मोठी मागणी आहे.





कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)